किरकोळ अंकास .... .... ०४ | Single copy ... ... ... 4 as.

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०३

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

VOL XXIX — AKOLA MONDAY 6 MAY 1895 — NO 17

वर्ष २९ — आकोला सोमवार तारीख ६ माहे मे सन १८९५ इ० — अंक १७

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बा. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया,कर्डी, लखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व पकारचे ज्वर, अर्धशीशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केचर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावे पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्यांचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे वंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, कोळसा, किराणा, हार्डवेअर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना.

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सर्टिफिकीट मिळण्याविषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याच्या माल मिळकतीचा कबज्या करण्यालायक मनुष्य नेमण्याविषयीं सन १८९० चा आक्ट ८ कलम १० प्रमाणें.

अर्जीचा नंबर क्लास १३ मिसल नंबर २/१८९५

विद्यमान दांडेकर सो बहादुर सिविल जडज्य अकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार अनपुर्णाबाई जवजे केशव नारायण तर्फे पालन करणार तीर्थरूप रामचंद्र गणेश जात निमकर ब्राह्मण राहणार बाळापूर

वरील अज्ञान अनपुर्णाबाई जवजे केशव जात निमकर ब्राह्मण राहणार बाळापूर तालुके व जिल्हा अकोला यांणें

त्याचें पालन व मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमला ह्मणून अर्जी दिला आहे यास्तव मृत्यु पत्राचे आधारें किंवा दस्तएवजा वरून किंवा आगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणा मनुष्यास सदहू अज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळ कर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं, त्याणी तारीख २२ जून सन १८९५ इसवी रोजीं वरील आर्जीची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत हजर होऊन आपल्या हकीकती दाखल करावी.

तारीख २९ माहे एप्रिल सन १८९५ इसवी

V. N. Dandeker.
सिव्हिल जडज्य.

शिक्का
सिव्हिल जडज जिल्हा आकोला.

क्लास नंबर १३ मिसल नंबर २/१८९५

विद्यमान जिल्हे जज्ज साहेब बहादुर जिल्हा अकोलें यांचे कोर्टांत.

सन १८९० इ. चा आक्ट नंबर ८ कलम १० अन्वयें अर्ज.

अनपुर्णाबाई जवजे केशव नारायण निमकर ब्राह्मण राहणार बाळापूर जिल्हा अकोले तर्फे पालन करणार बाईचे तीर्थरूप रामचंद्र गणेश सितुत हे अर्ज करितात कीं मयत केशव नारायण निमकर रहाणार बाळापूर यांची विधवा नामें अन्नपूर्णाबाई ही इस्टेटीची वारस असून अज्ञान असल्यामुळें तिचें पालन करण्याचा व सांभाळ कर्त्या या नात्यानें तिच्या इस्टेटीची व्यवस्था करण्याचा अधिकार मिळावा ह्मणून जिल्हे जज्ज साहेबास विनंती आहे.

अर्जांत लागणारी माहिती खालीं दाखल केली आहे.

( अ ) अन्नपुर्णाबाई जात ब्राह्मण जन्म तारीख पक्की आठवत नाहीं. तरी मुलीचें वय अदमास १०।११ आहे.

( ब ) अन्नपुर्णा ही विधवा असून तिचा नवरा केशव नारायण निमकर हे माघ शुद्ध १४ ह्मणजे फेब्रुवारी ता. ८ शुक्रवारी मयत झाले आहेत.

[ क ] मयताची खालीं लिहिलेली इस्टेट स्वसंपादित असून ती याच कोर्टाचे हद्दींत आहे आणि त्याची बायको नामें अन्नपुर्णाबाई ही मयताची पूर्ण वारस आहे.

स्थावर

किंमत

२५० स. नंबर ३२ मौजे मारोडी तालुके बाळापूर पूर्ण मालकीची स. नंबर ५७ मौजे कासारखेड तालुके बाळापूर पूर्ण मालकीचे

६५० स. नंबर ४२ मौजे सोमठाणा ता. आकोला पूर्ण मालकीचे.

४०० गाहाण कर्ज येणें ते
तपसील पाहिजे.

१६०० मे. एक्झिक्युटीव्ह इंजनियर आकोला यांच्या आफिसांतून कंत्राटाचें काम केल्याबद्दल येणें आहे.

७९० ॥।= किरकोळ असाम्याकडून कर्ज येणें आहेत तपसील पाहिजे.

———

३६९० ॥।=

( ड ) अज्ञान अन्नपूर्णाबाई ही अर्जदार तीर्थरूप रामचंद्र गणेश सितुत यांच्या पासी असून अर्जदार हल्ली अकोल्यास असतात व कायमचे बडोद्यास राहणारे आहेत.

( इ ) अज्ञान अन्नपूर्णा हीचे जवळचे नातलग येणें प्रो।.

१ अज्ञान सापत्न मुलगी पांच सहा वर्षे ही अर्जदार याजपाशी आहे. तिचें पालन करणें अर्जदार कडेसच आहे.

२ मयताचा एक सख्खा बंधु वडेसर व अविवाहीत असा होता. परंतु तो परगांवा असून त्याचें नांव व ठिकाण अर्जदारास व अज्ञानास माहीत नसून ह्मल्ला अज्ञान व अर्जदार हे ओळखत नाहीं.

माहेरचे नातलग

३ तीर्थरूप अर्जदार

( फ ) अज्ञानास कोणी गार्डीयन नेमलेला नाहीं.

( ग ) पूर्वी कधीं कोणत्या कोर्टांत अर्ज करण्यास कारण पडलें नाहीं.

( ह ) उभयता अज्ञानाचे पालण करण्यासाठीं व उभयता अज्ञानाचे इस्टेटीची व्यवस्था करण्यासाठीं अर्जदारास नेमलें जावें.

( आय जे ) अर्जदारास अज्ञानाचे पालण पोषण जन्मभर करणें भाग आहे आणि अज्ञानाचे शरीराचे आणि जिदगीचे पालण पोषण करण्यासारखें दुसरे कोणी नाहीं ह्मणून गार्डीयन नेमण्यासाठीं हा अर्ज केला आहे.

( के ) मयताचे कर्ज वसूल होण्यासाठीं

व मयताचे कर्ज घेण्यासाठी व अन्नाचे पोटा पाण्याची सोय वगैरे योग्य कायदेशीर देण्यासाठीं हा अर्ज करणें भाग झालें.

(सही)
फिर्यादीची

साक्ष

१ बापू श्रीधर काळे ( याची सही )
१ नरहर खडेगाव रहाणार अकोले (याची सही)

सदर्हू अर्जांतील मजकुरा पैकीं जो मजकूर ऐकिल्यावरून व खरा आहे ह्मणून मान्य केल्यावरून लिहिला आहे तो मजकूर खेरीज करून बाकीचा मजकूर माझ्या माहिती प्रमाणे खरा आहे ऐकिलेला व खरा ह्मणून मानलेला मजकूर खरा आहे असा भरंवसा आहे.

(सही)
फिर्यादीची

टीप— सदर्हू अर्जदार अकोल्यास हल्लीं रहात आहे तेव्हां वडोद्यास जाहिरात पाठविण्याची जरूरी नाहीं.

खरी नक्कल फिर्यादीची सही

खरी नक्कल
झास नं० २

—

९१

यादी गाहाण व किरकोळ असाम्या वरून येणें प्रमाणें तपशील खालीं लिहिल्या प्रमाणें.

४०० गाहाण बद्दल मौजे तांदळी तालुके बाळापूर येथील जमिनीं बद्दल.
१ सर्वे नं. ७० पैकीं एकर गुंठे ५८।१९ आकार रुपये ८
२ सर्वे नं० २० एकर गुंठे १८।१९ आकार रुपये ८

७९०।।।≡ किरकोळ असामीवार येणें याचा तपशील.

३०० गंगा मर्द सदू सोनार रहाणार अकोला
९० आप्पा वल्लद कुतकप्पा तेलंग राहाणार बाळापूर
५० इमाम्या वल्लद अनवर राहाणार पातूर.
५० गंगाराम मर्द जो बाळापूर
८९।।।= शेख रुस्तम वल्लद खान महमद राहणार बाळापूर.
४० हुकुमनामा तहशील कचेरी बाळापूर
४१ पैकाजी वा। विधाजी राहणार कासार खेडे ता० बाळापूर,
९९ शेख रुस्तम वा। खान महमद राहणार बाळापूर.
९९ खंडू वा। सटवाजी ता० बाळापूर.
५० हनवतो वा। काश्या बाळापूर.
३५ गणु वा। आमराजी राहणार बाळापूर.
५० पांडु वल्लद हनमंता

७९०।।।=

सही फिर्यादीची.

खरी नक्कल
Tukarm Waman
शिरस्तेदार

---

नोटीस

नोटीस खालीं सही करणार यांजकडून बळवंत नानराव देशमुख मौजे खेडें तालुके जळगांव जिल्हे अकोलें यांस.

तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं आह्मी तुह्मास महादु वानखेडेवाले शेत मौजे वजूर येथील सालमजकूरचे पिका पुरतें ह्मणजे सन १८९४ सालापुरतें रुपये ४० चाळीस यास लावलें त्यास तुह्मी सदर्हू शेताचे आमचे स्वामित्वाचे रुपये अद्याप पावेतों दिले नाहींत त्यास सदर्हू रुपये आठ दिवसांचे आंत देऊन आमची पावती घ्यावी व पुढें सालास तुह्मी शेत वहूं नये. जर वाहिल्यास सन १८९५ सालचे आमचे स्वामित्वा बद्दल रुपये ६९ तुमचे जवळून घेण्यांत येतील. असें वर लिहिले प्रमाणें न केल्यास रीती प्रमाणें कोर्ट मार्फत तजवीज केली जाईल. नोटिशीचा खर्च तुमचेवर आहे. कळावें तारीख ४ माहे मे सन १८९५ इ.

( सही )
१ नारायण नागेश मुखत्यार
दस्तुर खुद.
१ ( मारवाडींत ) सतीदास साहेबराय
दस्तुर खुद

---

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध १२ शके १८१७

वऱ्हाडांत हल्लीं एक ' देशमुख सभे'ची टूम निघाली आहे. देशमुख सभेचा जन्मकाळ अगदीं अलिकडचा आहे आणि तिच्या बैठकीच्या हकीकतीवरून या सभेचा उद्देश सामाजिक सुधारणा करण्याविषयींच आहे असें स्पष्ट दिसतें. सभेसारख्या संस्थेची जत्रा अलिकडे बहुतेकांस चांगली समजली आहे आणि कोणत्याही उपयुक्त कार्यांत पुष्कळ जणांनीं एकत्र जमून बहुमताच्या सल्यानें वागणें फार चांगलें असें आतां कोणास शिकवावें लागत नाहीं. सभाची योजना मांडणावळ व मातबरी या गोष्टी बहुत लोकांच्या ध्यानांत चांगल्या उतरल्या आहेत आणि वऱ्हाडांतील देशमुख मंडळी इतकी धूर्त व सामाजिक कार्यांत इतकी पुढारी आहे हें पाहून आह्मांस संतोष वाटतो. सुधारणेच्या जागा कोण कोणत्या, आपापली कुटुंबरचना कोठें कोठें चुकीच्या पायावर आहे, आणि कालानुरूप आपले प्रगमनाचे मार्ग कोणते आहेत या गोष्टीचा अंतःकरणांत उजेड पडला ह्मणजे निम्मी सुधारणा झाली असें आह्मी समजतों. खरोखर, देशमुख लोक स्वकीय उन्नती करितां एकत्र जमतात, भवति न भवति करून कांहीं नियम स्वतांस घालून घेतात व त्या नियमा प्रमाणें वागण्याची इच्छा धरितात हें बहुत आनंदास कारण आहे पण सांप्रतच्या सभेच्या वर्तनावरून आह्मास या सभेच्या आवश्यकतेची व उपयुक्ततेची शंका वाटते.

प्रथम, देशमुख लोकांचा वर्ग कोणता आहे याचा आह्मांस नीटसा बोध होत नाहीं. देशमुख ही संज्ञा ज्ञातिविशिष्ट नसून वतनवाडीच्या संबंधानें कांहीं लोकांस प्राप्त झालेली आहे. राजकीय इमारतीचे देशमुख लोक हे कोणता तरी भाग आहेत. देशमुख ह्मणजे एका प्रकारचा वतनदार अधिकारी. या वतनदारामध्यें हिंदु व मुसलमान या उभय धर्मपंथाचे लोक आहेत. हिंदु देशमुखामध्यें देखील ब्राह्मण, तांबोळी, माळी, कुणबी इत्यादि सर्व जातींचा आढळ होतो. तेव्हां आपल्या या देशमुख सभेचे सभासद कोण व तिचे इतिकर्तव्य काय याचा आह्मास नेट अटकळ नाहीं. देशमुख कांहीं खरे वतनदार व कांहीं अडनांवी असतात. तेव्हां या नानाविध देशमुखांचा एक निराळा वर्ग काढून किंवा जात काढून तिची सभा स्थापिली आहे कीं काय? वऱ्हाडच्या व इतर प्रांतीच्या देशमुखांची नामावळी सभेनें तयार करून त्या यादीतल्या इसमावर सभासदपणाची शिक्कामोर्तब मारण्याचा सभेचा घाट आहे की काय हें कळत नाहीं.

वऱ्हाडांत एक वतनदारसभा उर्फ जमीनदारसभा या नावाची उपयुक्त संस्था निघाली होती पण ती बहुधा नामशेषच होऊन राहिली आहे. या बहुव्यापक व महत्वाच्या संस्थेचें पुनरुज्जीवन झालें असतें ह्मणजे आह्मास विशेष आनंद वाटून देशमुख सभेचें राजकीय काम सर्व सुयंत्र व सुरळित चाललें असतें. वऱ्हाडात तशीच एक सामाजिक सभा आहे तेव्हां तिच्या आश्रयाखालीं देशमुखच काय पण देशमुखाहून इतर सर्व जातवाल्या लोकांस सामाजिक सुधारणा करण्याचे दरवाजे खुले होतेच पण तदन्तर्गत न होता देशमुखांनीं आपली डोकी वृथा सभेचा अवडम्बर घालण्यासाठीं वर केलीं हें पाहून नवल वाटतें! देशमुख सभेच्या चालकांच्या कोणत्या कल्याणप्रद बाटा असतील त्या आमच्या डोळ्यास दिसून पडत नाहींत तथापि तात्पर्य दृष्टीनें सुविचार देशमुख लोक या सभेच्या द्वारें प्रचलित करितात आणि त्याला अनुरूप चांगले आचार राखण्या विषयीं कबूल करितात हें पाहून कोणास आनंद वाटणार नाहीं? देशमुखा सारखे मागसलेले लोक असे पुढें सरसावतात याबद्दल त्यांचें कौतुक करावें तितकें थोडेंच! उदाहरणार्थ, एक पत्नीचें व्रत, मुलामुलींच्या लग्न समयीं अनुक्रमें १६ व १० वर्षांची वयाची इयत्ता, हुंड्याचा निषेध, मुलामुलींच्या लग्नांतील बुडित खर्चाला वर्षाच्या प्राप्तीचें प्रमाण, मद्यपान निषेध विद्याभिवृद्धीचा यथाशक्ति प्रयत्न या व अशा सारख्या वचनांचें प्रतिपालन करण्यास देशमुख लोक सहीशिक्क्यानिशीं स्वतांस बांधून घेतात हाच सुधारणेचा यंग आहे असें आह्मी ह्मणतों पण या अमृतकुंभांत विष कालविल्या प्रमाणें देशमुख सभेनें एक सातवा ठराव पसार केला आहे तो वाचल्या बरोबर या सभेची दिशा चुकली आहे आणि अकल्पित विघ्न घरीं घालून आमच्या समाजांत नवीन येत आहेत असा आमचा पक्का ग्रह झाला. "मी पाटलाच्या घराण्याशीं सगाई करणार नाहीं" हा ठराव अति दोषमूलक आहे. कूळ, शील, संपत्ती इत्यादिक अंगे लक्ष्यांत घेऊन शरीरसंबंध जुळत असतात तेव्हां या प्रस्ढ आचाराला सोडून देशमुख मंडळींनीं पाटलांच्या घराण्यांस हलक्या दर्जांत लेखिलें इतकेंच नाहीं तर त्यांच्याशीं रोटीव्यवहार व बेटीव्यवहार चालू असतांही बेटीव्यवहाराचा या ठरावानें प्रतिषेध केला हें मोठ्या खेदास कारण होईल.

देशमुख सभेचा उद्देश यावरून असा दिसतो कीं, देशमुखांची एक उच्च जाती बनवावी आणि त्याच नव्या निर्मिलेल्या जातीच्या परिघाच्या आंतच बेटीव्यवहार मर्यादित व संकोचित करावा. उलटें, पाटलांनीं जमून देशमुखांस या कल्पित हमरस्त्यांतून कळपाच्या बाहेरच ढकललें आणि आत्मसंरक्षणाच्या हक्कानें देशमुखांस जातेबहिष्कृत केलें तर एक विचार करण्यासारखाच प्रश्न उद्भवेल. विचार जपजसा अधिक करावा तसतसा आमचा पक्का ग्रह होत चालला आहे कीं, सांप्रतच्या देशमुख सभेची गरज नसून तिजपासून कांहीं लाभ होण्याची आशा न लागतां निराशा मात्र वाढत आहे.

---

कधीं कधीं तुलनेनें मनुष्याचे विचार सुस्थावस्थित व निश्चयात्मक होतात. इतर राष्ट्रांतील स्थित्यंतर सामान्य ध्यान्यांत आणिलें ह्मणजे आपल्या राष्ट्रांतील प्रस्तुत स्थितीचा अंदाज पूर्णपणें स्पष्टपणें कळून येतो. आमच्या प्रगमनाच्या चक्रा बरोबर आपल्या प्रमाणें इतर राष्ट्रेंही फिरत आहेतच तेव्हां आपली अवस्था त्यांच्याशीं जुळते कीं काय या प्रश्नाचा निकाल अलिकडे धर्मा संबंधानें फार उत्कृष्ट होत आहे. नामदार न्यायमूर्ती रानडे यांनीं नुकतेंच समप्रमाण दाखविलें आहे कीं, युरोपांत जशी धर्मक्रांती झाली आणि कथालिक धर्माचा लय होऊन प्रॉटेस्टंट धर्मस्थापना झाली तद्वत आपल्या जुन्या वैदिक धर्माला रूपान्तर मिळून भागवत धर्मपंथाचा प्रसार झाला. या भागवत धर्मानें मुख्य मुख्य आठ प्रकारच्या सुधारणा केल्या आणि त्या साठी बोलस्य वृक्षांचा आतां भरंवसा वाटूं लागला आहे. ह्या तुलनेनें जसा आपल्या धर्मक्रांतीचा बोध व्यक्ततेनें झाला त्या प्रमाणें विलायतचे मुत्सदी व शास्त्रवेत्ते यांनीं धर्मश्रद्धे विषयीं लोकांच्या मनाची जी स्थिती उत्कृष्ट दाखविली आहे ती स्थिती आमच्या देशांतल्या लोकांसही चांगली लागूं पडते. ईश्वर हा सर्वव्यापी व सर्वांचें आदिकारण आहे असा मूळचा समज होता. परंतु पुढें समानासूत्रें आपल्या हातीं आलीं आणि समानविषयक कर्तुमकर्तुम शक्ति हस्तगत झाली असें मुत्सद्यास वाटूं लागलें; आणि तद्वत शास्त्रवेत्त्यांचाही ग्रह झाला कीं आपण आपल्या ज्ञानसामर्थ्यानें व पदार्थाच्या गुणधर्मानें जगाचे विश्वकर्मे सुद्धां बनूं. हे दोन्ही ग्रह भ्रांतिमूलक व असमाधानकारक शोधान्तीं ठरले आणि मुत्सद्यांस व शास्त्रवेत्त्यांस आपली स्वकार्यशक्ती कळून चुकली तेव्हां या तिसऱ्या बाजूत जगाचा चालक कोणी तरी अंतिम असलाच पाहिजे आणि त्या परमेश्वराशिवाय मानवी बलांच्या, ज्ञानाच्या व विचाराच्या पलिकडील जगांतील गोष्टी घडून यावयाच्या नाहीत असा भरंवसा पडत चालला. ईश्वरी प्रेरणे वाचून कांहीं घडत नाहीं आणि ईश्वरी नेमानेम चुकत नाहीं अशी मनोवृत्ती धर्ममतांत प्रचलित झाली आणि तिच्या प्रभावामुळें लोक अलिकडे धर्मनिष्ठ होऊं चालले आहेत. आमच्या मतें हेच स्थित्यंतर आमच्या हिंदुधर्मा संबंधानें होत चाललें आहे जुन्या पिढीचा नव्या शिकलेल्या लोकांवर नेहमीचा आरोप असे कीं, त्यांच्या म

बील धर्मनिष्ठा वृद्धत चालली. या आरोपाच्या बहुत सटीक आवृत्ती निघाल्या पण अलिकडे शिकलेल्या लोकांमध्यें धर्मबुद्धी पुन्हा जाग्रत होत चालली आहे आणि ही गोष्ट मोठ्या आनंदाची होय.

अलिकडे डाक्यांचा फार सुळसुळाट झाला आहे. तहशिलीच्या गांवानजिक देखील डांके पडतात या मुळें लोकांची त्रेधा उडाली आहे. डाकेखोर इसम हत्यारबंद असतात आणि ते इतकीं अनन्वित कृत्यें करितात व स्त्रियांस देखील इतके छळतात कीं, डांक्याची वार्ता एकली ह्मणजे अंगावर शहारे उभे राहतात. लोकांस जीवित्वाचा व मालमत्तेचा सुखरूपपणा अगदीं वाटत नाहींसा झाला आहे. सरकारी नांव मोठा चमत्कारिक आहे. पोलिसांच्या हातून योग्य बंदोबस्त रहात नाहीं. परवां जळगांवाजवळच्या दोन कोसावरील गाडेगांवास मोठा डांका पडला. तपास चालू आहे. पण अशा तपासानें लोकांचें जीवित सुरक्षित रहात नाहीं. पोलीस थकले ह्मणून हत्याराचा परवाना मागावा तर सरकारचा जीव कचरतो. प्रजा निःशस्त्र आहे व पोलीस दुर्बळ आहे तेव्हां सारांश असा निघतो कीं लोकांच्या प्राणाची व जिनगीची व्यवस्था डाकेखोरांनीं मर्दुमकीनें हवी तशी लावावी. हत्याराचा कायदा निरुपाच तरवार रचला आहे आणि आत्मसंरक्षणार्थ देखील हत्यारांचा परवाना मिळूं नये असा त्याचा भावार्थ नाहीं. परंतु रुचेपुढें शहाणपण नाहीं आह्मास तर हल्लींफिलवर चालेल्या भिकार दशेची मोठी दहशत बसली आहे. लोकांपाशीं त्राण नाहीं. सारा वाढल्यामुळें शेतीच्या धंद्यांत पोट भागत नाहीं. पुर्वीच्या सवलती प्रमाणें जमिनी आतां वाहण्यास मिळत मिळत नाहींत. सरकारी सारा बाढल्यामुळें जमिनीच्या मालकांनीं बटाईदारांवर बोजा भारी बसविला आणि तशांत थोडी तंगीची व महर्गतेची गेली दोन वर्षें गेल्यामुळें डाके अधिक पडूं लागले आहेत असा आमचा तर्क आहे. अशा स्थितींत पोलीसाची व्यवस्था भक्कम ठेवावी आणि हत्याराचे परवाने अधिक खुषीनें द्यावे ह्मणजे कांहीं थोडासा बंदोबस्त होईल असें वाटतें.

चित्राळची मोहिम संपलीच ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. बहुत करून चित्राळचें डोंगराळ राज्य आमच्या इंग्रजी साम्राज्या खालीं घेण्याचा विचार असावा आणि तत्काला नामधारी मेहतर कोणी नेमून राज्यसूत्रें इंग्रज सरकार हातीं घेणार असल्या विषयीं लोकांचा तर्क आहे. चित्राळची स्वारी आरंभा पासूनच नको होती पण राजवतृष्णेचा प्रभाव कसा तरी निदर्शनास आला. असो हें युद्ध लवकर मिटेल आणि लढाईच्या खर्चा खालीं आमच्या देशाचा ज्यास्त चुराडा न होईल तर बरें!

मुंबई इलाख्यांतील मध्यभागाला एक कौन्सिलदार निवडून देण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. हल्लीं निवडणूक चालूं असून चार उमेदवार पुढें आले आहेत. त्या चौघापैकीं रा. रा. बाळ गंगाधर टिळक बी. ए. एल. एल. बी. हे एक आहेत. आणि सद्यां संभव असा दिसतो कीं राजश्री टिळक हेच बहुमतानें निवडले जावेत. हे गृहस्थ प्रसिद्ध केसरी व मराठा या पत्रांचे प्रकाशक आहेत. यांचे लेख नेहमीं उदात्त विचारांचे, सभ्यपणाचे व सणसणीत असतात. दोषदर्शन यथास्थित व हृदयंगम असतें. लार्ड हारिससाहेबांचा प्रकाश छत्र या पत्रकर्त्यांच्या लेखानें सर्वांस उत्कृष्ठ प्रकारें कळला. हे पहिल्या प्रतीचे पत्रकर्ते आहेत आणि यांच्याच धोरणानें नेटिव पत्रांतील मतप्रकाशनास एका प्रकारची चांगली दिशा लागली तेव्हां मोठ्या दुःखाची गोष्ट कीं कांहीं ग्याझेटकर्त्यासारख्या आंग्ला इंडियनांनीं व हिंदुशत्रूंनीं राजश्री टिळकाविषयीं दुस्सह व मिथ्या प्रलाप करावेत आणि राजश्री टिळक यांस बहुमतानें निवडले तरी देखील गव्हरनर साहेबांनीं आपल्या अधिकाराच्या जोरावर त्यास कौन्सिलदार नेमूं नये अशीही सूचना अगोदर पासूनच येऊं लागली याहून अन्य लांछनास्पद कृत्य तें कोणतें! राजश्री टिळक हे उत्तम पत्रकर्ते आहेत आणि त्यांच्या पत्रकर्तृत्वाविषयीं अवगुणी शंका घेण्यांत आली ह्मणून आह्मी हें मुद्दाम लिहिलें आहे.

# The Berar Samachar

MONDAY MAY, 6, 1895

## LEADERS OF MASSES
### NO. VI
(Communicated)

Of what universal ideas shall we endavour to lay the foundation of? What course of discipline should we adopt to carry the masses through. Here is a question of the greatest moment for such of us who have the love of their country at heart? Now it will be admitted by all that man has all along been struggling against three principles. He struggles against nature. He struggles against society. He struggles against religion. The plough, the prison and the temple are the symbols of that struggle. There is a perpetual waged war either for these or against these. All leadership is resolved in one or more of these fights. In this land there has been a struggle perhaps the greatest in the world's history against religion and for religion. But for or against nature or society the history of the land is almost a blank. That a nation should not have struggled for these three, is not and ought not to be a matter for congratulation. Its absence certainly does not speak much for the genius of a civilization that once flourished Nature existed; some of the worst evils of society existed and yet not a hand should be uplifted. Subdue nature or remove the social evil is certainly marvellous, almost astounding. Now these three struggles must commence in right earnest, and it is these three struggles that must be supported by some of the most glorious universal ideas. As remarked before, Nature has been our worst of oppressors. Her tyranny has been tremendous and appalling. She has killed us out—right. She has won a victory without a blow being struck by our defence. And now see the result: our insignificant actions in life or done in fear of her Can we pierce this mountain? Impossible. Can we span this gulf? Can we bridge this stream? Can we gauge the momentum of the thunder-bolt? Can we make this flash innocuous? Impossible. The Diety will be angry. Can we travel this expance in the shortest time possible? Can we draw the treasures of the deep to the shores? Impossible. This one word, this one sound and this one tale echoes through time, through history and through the human heart. This melancholy tale has almost a tragic bearing on us. The lofty peaks are Kailasas *i. e.* inaccessibility. The depths are the abodes of water-deities, that is to say inviolability. The thunderbolt is an axe of heaven that falls on both the guilty and the innocent; that is to say, irresistible-death-blow for human presumption. The cobra is nature's speedy revenge. Now inaccessibility, inviolability, irresistible fury, revenge have all conspired against us and opposed to us a hideous monster. The monster—impossibility must be hung, quartered, hacked and maimed. The mind must awaken to one universal idea how much possibility there is in what we have, all along, been calling impossible. These spurious gods and goddesses must be dethroned and trampled under foot with all their hideous monstrocities. This war is a terrible one. It must be waged at any cost. We all know that other fortunate nations have more easily embraced this idea; some of them have reaped benefits of lasting significance; and the adoption of that idea seems to be the necessary result of the awakening of the reason of the human race.

We are glad to observe that Mr. Hare our esteemed municipal President and Deputy Commissioner is alive to the short—comings and delays of the new water—works. We hope he will not lag behind to use his active and controlling infinences to awaken the slumbering Engineers of the Public Works Department. They have failed in their duty towards the public of Akola. We donot understand the causes of this extraordinary delay; and people cannot rest satisfied unless a clear and truthful explanation of the further programme is offered in connection with the extension of water—pipes throughout the town.

It is well and good that the use of the river—water is strictly forbidden. It is a prompt measure to force people to drink good potable well—water which runs through the major portions of the town. The lower classes connot but have recourse to the general water—stands and people revolt at the strange groups the different classes form at the public posts. Religious observances are disturbed to a great extent and it is advisable to erect some new water—stands for the separate use of those distinctive castes who can intermingle only under some social penalty of ablutions and the burning and breaking of water—pots. Mr. Hare has personally gauged well the inconveniences and difficulties which a good salutary order of prohibition has forced people to undergo. We hope he will set right the matter and make amends for general grievances by ready and immidiate remedies.

The *vernacular press* is the topic of the day. We confess that it admits of improvements as every human institution does. But on the ground of these possibilities it is a wrong attempt to find fault with its moral tone. Professor Kathvate did surpass the Anglo—Indians in his condemnation of this important fact or of the social polity. We would recommend our opponents to inwardly digest the eloqnent and sound opinion of Sir R. Garth when he refutes the late Mr. Chesney's false accusation of the native journalism. It runs as follows:—

Sir George Chesney says it is seditions; that it foments disaffection against British Rule; and he would cramp its freedom by placing it under Government control. In other words he would wish the Government to take the law into their own hands. and prevent the criticism by the Press of any high-handed conduct on the part of Government officials. I believe that any attempted coercion of this kind would be a most disastrous step. It was considered a very unwise measure in Lord Lytton's time, and it would be for worse now. What Sir George calls sedition, I do not know. I can only say, I read Native Papers myself and never see any thing there at all approaching sedition, or even disloyalty or disrespect to English Rule.

What I do find there, and what I rejoice to find, is thoroughly well-deserved censure of the aribitrary conduct of many of the Government officials—I am afraid this is exactly, what the Government would wish to repress. I consider it a most wholesome and salutary means of bringing the misconduct of Government officers to the notice not only of the Indian public but of the Courts of Justice. In many remote parts of the Indian Mofussils this action of the Press is literally the only means of bringing such offences to light, and of preventing the most outragious acts of petty tyranny.

## वऱ्हाड

हवामान—उष्मा अतिशय होतो. पण वारा चांगला सुटतो व रात्रीं थंडावा ब्वहर होतो या मुळें पुष्कळ बरें आहे. किरकोळ दुखणीं बहुत आहेत व पटकीच्या आजाराचा तुरळक आढळ होतो.

नदीचें पाणी पिण्याविषयीं मनाईचा हुकूम फार सुंदर सुटला आहे पण नळ मुख्य मुख्य ठिकाणीं व जातिभेदाच्या मानानें पुरेसे नसल्याकारणानें लोक नाखुष आहेत तेव्हां नळाची कमतरता दुर झाली पाहिजे.

वाशिमाकडील डाक्यांतील सर्व आरोपी दोषमुक्त झाले. या डाक्यात पुष्कळ किमतीचा माल चोरीस गेला पण थोडा माल दाखविण्यांत येऊन तो आरोपींनीं दाखविला अशा पुराव्यावर खटला सेशन कमिट झाला होता. खरे डाकेखोर कोण याचा पत्ता नाहीं.

बुलढाण्याकडील एका मनुष्यानें खोटा दस्तऐवज तयार करून त्यावरून फिर्याद केल्याचें शाबीत झाल्यावरून त्यास सात वर्षांची ठेप झाली.

मि. आवर्ड साहेब उन्हाळ्या निमित्त एक महिन्याच्या रजेवर मध्यप्रांतात गेले आहेत.

## वर्तमानसार.

चीन जपान लढाईस विशेष जोर येण्याचा रंग दिसूं लागला आहे. चीन जपानचा तह झाला, पण आतां रशिया, जर्मनी व फ्रान्स यांणीं एक नवी कुरापत काढली असून ते तिघे मिळून जपानच्या मागें लागणार असें दिसूं लागलें आहे तह वरून चीनचा जो प्रांत जपानास मिळाला तो घेण्याचा जपानास हक्क नाहीं असें या तिघांचें ह्मणणें आहे आणि त्याप्रमाणें त्या तिघांनीं एकत्रपणानें जपानास लेखी नोटीसही दिली; अर्थांत नव्या तंट्याची ही सुरुवात. हा तंटा सुरू झाल्यास ते तिघे एका आंगास व एकटा जपान एका आंगास असे होणार. व तसा प्रसंग आल्यास जपानच्या परिक्षेचीच वेळ येणार; त्या तिघाच्या या नोटीशीस जपानानेंही चांगला खरमरीत जबाब दिला तेव्हां आतां कोणी तरी माघार न घेईल तर दोन हात होणार असें दिसतें.

राणीचा वाढ दिवस हिंदुस्थानांत यंदा तारीख २५ मे. रोजीं पाळला जाणार आहे.

आर्सिकर पासून मंगलोरबंदरा पर्यंत रेल्वे करण्याची र्‍वे करण्यास ८८,००० रुपयांची मंजूरी झाली.

बडोदा रेल्वे पासून तापतीपर्यंत साठ मैल लांबीचा एक रेल्वेचा फांटा अमदाबाद प्रांताच्या फायद्याच्या शर्तीवर तयार करण्यास स्टेट सेक्रेटरीची मंजुरी झाली.

इजिप्त प्रकरणाबद्दल इंग्लंड व फ्रान्स यांच्या कांहीं कुरबुर चालली आहे.

येत्या हिवाळ्यांत तेहेरान येथें रशियांतल्या कारागिरी पदार्थांचें एक प्रदर्शन होणार आहे.

चित्रळ किल्ला क. केलीने ता० २० रोजीं हस्तगत करून डा. राबर्टसन यांस खुलें केलें.

राबर्टसन वायाळ झाला आहे. क्या बर्ड मेला. क्या. क्पांबेल जखमी झाला आहे केलिचे बरेच लोक ठार झाले.

पेशावर पासून मुंबईपर्यंत आपला जो सन्मान झाला त्याबद्दल आपण खुष झालों असें आमिर पुत्रांनीं मुंबईस बोलून दाखविलें.

सीबी व क्वेटा यांच्या दरम्यानचा पूल तयार होऊन आतां थेट आगगाडी चालू झाली ह्मणजे अर्थात हिंदुस्थानच्या एका टोकाची फौज पाहिजे तेव्हां दुसऱ्या टोकावर नेऊन कामास लावण्याची सोय झाली. देशांत शांतता असे पर्यंत या रेल्वेच्या सोई फारच फायद्याच्या आहेत.

हिंदुस्थानांतल्या रेल्वेचें ३१ मार्च १८९५ पर्यंतच्या मुदतीचें उत्पन्न अंदाजापेक्षां १,०३,२४,२६७ रुपये जास्त झालें.

### गृहदशेचा फटका.

( दोंदिवसांची तनु. ह्या चालीवर )

चारा नाहीं थारा नाहीं जनावरांची कठिण दशा। अर्धउपाशीं तडफड करिती काढित असती उठाबशा। बंहीवांचुनी थंडी लागे लंगोटिही नसे पुरी। फटकुर धोतर जुनें मिळेना मुंडासें त्या कुटून शिरीं। थाळा माळा वाटी पाटी सुडके मडके विळा खिळा। तुटके जाळें फुटके पाळें भाकर तुकडा तोहि शिळा। येरंडीचें तेल दिव्याला ठेविती मेणीबर पणती। ढेकूण पिसवा मी मी ह्मणती उवांस नाहीं खिसगणती। ठाव लांकडी कुकडी असती पांच सहा। शतकऱ्यांचें मोठें घेंटे वैभव सारें हेंच पहा। गाडा विकिती नाडा विकिती तरीहि बाकी व्याज असे। सावकारांचें ग्रहण लागतां मोक्षकाळ हा कधीं नसे। क्षेत्रकार हा सेवा करुनि वर्धन करितो देशयश। दारिद्र्य नें पाठ पुरविली पहा तयाची कठिण दशा। हाल सोशितां साल निवाली जन्म नहाला पुरे पुरे ॥काळच० ॥ १ ॥ धंदा आमुचा मंदावोनी बंदा केला अन्यजनीं। अग्निकलेच्या कार्यांपासुनि गाड्यांवरही तोचि धनी। पुड्या औषधी वड्या साबुच्या कड्या घराच्या सुबक छड्या। लिहाऱ्याची सुंदर टोकें पाहुनि लोकें घेति उड्या.

ठा०

डोकें खेपणारी टोपी— डोकें दुखीवर एक प्रकारची टोपी काढण्यांत आली आहे विजेच्या योगानें ती थर थर होत असते. ती डोकें दुखणाराच्या डोक्याला घालून त्यानें झोंप घेतली ह्मणजे त्याचें डोकें दुखण्याचें बंद होतें.

निझाम सरकारकारचें वारस पुत्र हल्लीं १० वर्षांचे असून वयाच्या मानानें त्यांची विद्या चांगली झाली आहे. घोड्यावर बसणें, भाला पट्टा खेळणें हीं कामें चांगलीं करीत असून उर्दू भाषेचा अभ्यास चालला आहे. मुसलमानीं धर्मांतही ते निष्णात होत असून पुढील सालापासून त्यांस इंग्रजी शिकवावयाचें आहे.

हिंदुस्थानांतील मेल गाड्यांच्या वेळांत फेरबदल करण्या संबंधानें नवीन व्यवस्था लवकरच प्रसिद्ध होऊन अमलांत येईल.

जर्मनीचे बादशहा विल्यम हे सांप्रत तारयंत्राचें काम शिकत आहेत.

मेहणाड पेट्यास रिव्हिजन सर्व्हे लागू होणार, अशी तिकडे वदंता होती. परंतु ड्यू साहेब बहाकले. यांनीं लोकांच्या अर्जाचा विचार करून सदरहू पेट्याची रिव्हिजन सर्व्हे करण्याचा विचार तहकूब केला व सन १८९५।९६ सालीं पासून ३० वर्षें पर्यंत पूर्वीची जमाबंदीच कायम राहील, असें जाहिरनामे काढले आहेत, व त्या प्रमाणें सरकारासही लिहिल्याचें समजतें. वी. बं.

चित्रालची लढाई करून, केवळ सरहद्द बाढावयाची व तितका मुलूख आपल्या स्वाधीन ठेवावयाचा, या पेक्षां यांत दुसरा कांहीं हेतु नव्हता. आणि हें करणें केवळ अयोग्य होतें, वगैरे बाबतींत दिवाणी व लष्करी अमलदारांचे लेख, लंडन टाइम्स मधून प्रसिद्ध होऊं लागले आहेत.

आस्ट्रेलियांत व्हिक्टोरिया संस्थानांतील माल हिंदुस्थान, चीन व जपानांत खपण्यासाठीं झपाटून प्रयत्न चालला आहे. व त्यांत त्यांना चांगलें यश येत आहे. हिंदुस्थानच्या लोकांचें लक्ष, व्यापाराकडे नसल्या मुळेंच दरिद्र वाढत आहे.

युरोपांतील राज्यांचा आपआपसांतील कलहामुळें जपानचें चांगलें साधेल असें लंडन टाइम्सचें ह्मणणें आहे.

निजाम हैद्राबाद— उन्हाळा मनस्वी आहे. सोसाट्याचा वाराही मधून मधून सुटतो राजकीय लटपटी चाललेल्या आहेतच. युरोपियनांचें बरेंच फावतें असें जागजागीं आढळतें. खरें खोटें ईश्वरास ठाउक. स. वि.

श्रीमंतीची वाढ— गेल्या २०० वर्षांत इंग्लंडची संपत्ति ४० पट वाढली आहे.

घोड्याच्या लगामालाच विजेचे दिवे लावण्याचा प्रघात, बर्लीन शहरांत तूर्त फार वाढला आहे.

जे विद्या व्यसनी आणि स्वधीनचित्त असतात त्यांचे नाकाचा शेंडा गोलाकार असतो.

ज्या सि.

---

### "SIMULTANEOUS EXAMINATION.

Notice of Motion
The House of Commons
1895

Mr. Naoroji—Civil Service (India) (Simultaneous open Competitive Examinations in England and India), —That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of British Power, the loyalty, confidence, contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to increase largely commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these Proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd. June 1893, viz: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations in both Countries being identical in their nature, and all who compete being finally classified in one list according to merit.

हिंदुस्थानांत ब्रिटिश अम्मल चिरस्थायी करण्यासाठीं, हिंदुस्थानांतील लोकांची राजनिष्ठा विश्वास आणि संतोष कायम ठेवण्यासाठीं त्यांची औद्योगिक आणि नैतिक स्थिति सुधारण्यासाठीं आणि त्याचे योगानें ब्रिटिश संयुक्त राज्याचा फायदा करण्यासाठीं, १८३३ च्या कायद्यांतील, बंडा नंतरच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यातील, १८७७ च्या दिल्ली दरबारच्या व. १८८७ सालीं जुबिली दरबारच्या वेळीं दिलेलीं वचनें पाळली पाहिजेत आणि १८९३ च्या जून्या ३ च्या तारखेस सिव्हिलसर्व्हिस परिक्षा इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत एकसारखी घेत जावी असा जो ठराव आपण पास केला तो अमलांत आणिला पाहिजे."

---


## कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत ( उच्चारासह ) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेले किंमत ०१०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.

## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलायती काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक


---

### नोटीस.

नोटीस- बेशमी लक्ष्माबाई जवजे शिवनाथ लढ्ढे मारवाडीन राहणार मौजे मोप्र० रिसोड ता० जि० वाशीम इजला खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं.

तुमचा नवरा मयत होण्यास आज सुमारें ७ महिने झाले. दुकानचें काम बंद केलें आहे वरून अशी नोटीस देण्यांत आली आहे कीं, आमच्या व तुमच्या नवऱ्याच्या नावाचे दस्ताऐवज समाईक असल्यामुळें आह्मास फिर्यादी करणें आहेत व लोकांकडून पैसे येण्याचा मार्ग ह्मणजे फिर्यादी करणें अगर लोकांकडून नवीन दस्तऐवज अगर कोणत्याही प्रकारचें काम दुकानासंबंधीचे करावें लागत आहे. तर आतां या नोटीशी पासुन १५ दिवसाचे आत तुह्मी आपल्यांकडून कोणी तरी मनुष्य दुकानदार तुमचे खातरीचा मनुष्य ठेवून आमचे बराबर काम चालवावें. तसें न केल्यास आह्मी आपल्या हिशाबद्दल आह्मी निराळे दस्ताऐवज करून घेत जाऊं. फिर्यादी वगैरे करण्यास व समाईक ह्मणजे तुमच्या नवऱ्याचे व आमचे धनकोचे ठिकाणी बरोबर नांवें आहेत तर आमचे हिशाबद्दल आह्मी वसूल करणें अगर कोणी असामीचे हिशोब वगैरे करून नवीन पुर्जे करणें लागले किंवा फिर्यादी अगर आपसांत तंटा वगैरे तोडण्यास व सर्व प्रकारचे व मुदती पुर्ज्यांच्या गेल्यास आमचेवर बिलकुल जबाबदारी नाहीं. आसामीकडे जें कांहीं पैसे आहेत ते आह्मी वसूल करून घेऊ तुमचे हिशाबद्दल पैशाचे आह्मी जबाबदार मुळींच नाहीं. दुकानचे संबंधानें आसामीची वसूलाची तकरार तुमच्याकडेस आहे कळावें मिती चैत्र वद्य ५ सं० १९५२ ता० १३ येप्रील सन १८९५ इ०

सही

चुनीलाल गंगाराम मारवाडी द. खुद

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०१

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

Six monthly ... 3 „ ...
Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

VOL XXIX AKOLA MONDAY 13 MAY 1895 NO 18

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख १३ माहे मे सन १८९५ इ० अंक १८

ESTABLISHED IN 1880.

## HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

### जी. बा. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

### विजेच्या अंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

### रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धाशीशी, मस्तक शूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा-गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्या पासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

### विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

केंबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्यांचे व विशेष माहितीचें, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

## "SIMULTANEOUS EXAMINATION.

Notice of Motion
The House of Commons
1895

Mr. Naoroji—Civil Service (India) (Simultaneous open Competitive Examinations in England and India),—That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of British Power, the loyalty, confidence, contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to increase largely commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these Proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd. June 1893, viz: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations in both Countries being identical in their nature, and all who compete being finally classified in one list according to merit.

हिंदुस्थानांत ब्रिटिश अम्मल चिरस्थायी करण्यासाठीं, हिंदुस्थानांतील लोकांची राजनिष्ठा विश्वास आणि संतोष कायम ठेवण्यासाठीं त्यांची औद्योगिक आणि नैतिक स्थिति सुधारण्यासाठीं आणि त्याचे योगानें ब्रिटिश संयुक्त राज्याचा फायदा करण्यासाठीं, १८३३ च्या कायद्यांतील, बंडा नंतरच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यातील, १८७७ च्या दिल्ली दरबारच्या व. १८८७ सालीं जुबिली दरबारच्या वेळीं दिलेलीं वचनें पाळली पाहिजेत आणि १८९३ च्या जुन्या ३ ऱ्या तारखेस सिव्हिलसर्व्हिस परिक्षा इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत एकसारखी घेत जावी असा जो ठराव आपण पास केला तो अमलांत आणिला पाहिजे."

### नोटीस

शामराव बाबनजी तर्फे मुक्त्यार बाजीराव शामराव वस्ती पाळोदे तालुके मंगरूळ जिल्हा वाशीम यांस.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी वैदर्भ पत्रांत तारीख ६ एप्रील सन १८९५ चे दिलेली नोटीस अगदीं खोटी आहे.

२ जीं कांहीं शेतें आमचे कबज्यांत आहेत तीं फार वर्षांपासून आज पावेतों आंधी व हिशाब आह्मी करीत आहों. सदहू शेतें आमच्या कबज्यांत आहेत त्यांजवर तुमचा कोणत्याही प्रकारचा हक्क नाहीं.

३ सदहू शेतांच्या वायद्याची रक्कम रितीप्रमाणें व वक्तशीर अह्मी देत आलों व ती दिलेली आहे. कोणत्याच सालाची वायद्याची रक्कम आह्माकडेस राहिली नाहीं.

४ पुढील सालची वायद्यांची रक्कम वहिवाटी अन्वयें देण्याची असते.

५ सदहू शेताबद्दल व वायद्या बद्दल वगैरे विनाकारण त्रासदायक खोटी नोटीस देत जाऊं नका. व अशी नोटीस देण्याचा तुह्मास कोणत्याही प्रकारें हक्क नाहीं. या नोटिशीचा झालेला खर्च आठ दिवसाचे आंत आह्माकडे आणून द्यावा. जर न दिला तर रिती प्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें तारीख ९ मे १८९५ इ.

( सह्या )

गोविंदा वलद बाळाजी महार
वस्ती पाळोदी निशाणी खुद
पांडु वलद बाळाजी बोकसे वस्ती
पाळोदी निशाणी खुद
रामा वलद हैबती बाघ वस्ती
पाळोदी निशाणी खुद
कृष्णाजी वलद हनवती बाघ वस्ती
पाळोदी निशाणी खुद.
मिकम वलद संभाजी मापारी
वस्ती पाळोदी निशाणी खुद

### नोटीस

सिताराम वलद सदाशिव कृष्णपक्षी राहणार गव्हे ता० चांदूर यास दौलतराम देवकरण दुकान कुऱ्हा यांजकडून या नोटिशीनें असें कळविण्यांत येतें कीं मौजे गव्हे येथें तुमचे व आमचे शराकतींत दुकान आहे त्यास भांडवल आमचे लागलेलें आहे. सदरहू दुकानची वहिवाट तुमचे कडेस असून वह्या कागदपत्र वगैरे सर्व तुमचेपाशीं आहेत सदरहू दुकानचा सर्व हिशेब समजून देऊन आमचे हिशा प्रमाणें आह्मास जायदाद असाम्या वगैरे वाटून द्याव्या असें तुह्मास आह्मी कित्येक वेळां सांगितलें परंतु तुह्मी ऐकलें नाहीं- करितां या नोटिशीनें असें कळवितों कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत सर्व हिशेब दाखवून आमचे व्याजा सुद्धां मिळेल तें भांडवल व दुकानांतील आमचे हिशावर येणारा नफा व असाम्या ह्या वाटून द्याव्या. आमचे तर्फे हिशेब वगैरे पाहण्यास आह्मी सदाशिव गुंडाराम देशमुख राहणार कुऱ्हा यास नेमलें आहे तरी तुह्मी त्याजकडेस कागदपत्रासह हजर राहून सर्व वरील व्यवस्था करावी नाहीं तर आजपासून कोणी असामीचें कर्ज मुदतीबाहेर गेलें अगर दुसरे रितीनें तुमचे हयगयीमुळें बुडालें तर त्याबद्दल तुह्मास जबाबदार धरलें जाईल व सर्व व्यवस्था कोर्टमार्फत कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल कळावें तारीख ६ माहे मे सन १८९५ इ.

सही
दौलतराम देवकरण दुकान
कुऱ्हा दस्तुर खुद

ख्यात कीर्ति येईल तुम्हा आम्हाला होतां
जगतीं ॥ १३ ॥
गिरिवधिकालवालुकारण्यीं जातां
परलोकाला ॥
उमटतील अपुलीं रम्य पावलें मार्ग
दाखवायाला ॥ १४ ॥
दुस्तर संसारार्णव जातां तरून झाली
भग्न ॥
नौका ज्याची झाला आहे जो दुःखांत
निमग्न ॥ १५ ॥
नाविक असला एखादा पदचिन्हा त्या
पाहील ॥
हर्षचित्त होईल तयाच्या धीर मनीं
येईल ॥ १६ ॥
चला, गड्यांनो, उठा! करूं या आपण
सत्कृत्यांला ॥
निश्चय बळ सांगातीं असतां अपयश भीति
कशाला ॥ १७ ॥
एक विजय संपादुन होतां लागू दुसऱ्या
मार्गे ॥
शिकूं धीर धरण्याला तैसा यत्न कराया
BEE. सांगें ॥ १८ ॥

## वर्तमानसार.

चीनच्या बादशाहिणीनें युरोपांत पांच बाया पाठविल्या आहेत, त्यांनीं युरोपातल्या चालीरीती व उत्तम डौल शिकून येऊन त्यांचा प्रसार चिनांत करावा हा उद्देश.

सगळ्या जगांतील स्त्रिया व पुरुष यांच्या संख्येचें परिमाण पाहिलें तर ९८:१०० असें आहे. शेकडा दोनप्रमाणें स्त्रियांची संख्या कमी.

जपानांत जें एन्जिनीअरिंग कालेज आहे त्यांच्या इतकें उत्तम कॉलेज दुसरीकडे नाहीं असें ह्मणतात! त्यांत विजेचीं यंत्रें इतकीं उत्तम होतात कीं, यांचा आतां युरोपांत खप होऊं लागला आहे. क'

खेडा सुपरिन्टेन्डेन्ट मिसावी यांणें या गेल्या ऋतूंत २२१ हत्ती पकडले व त्यांतील बहुतेक मिमनासिंग येथें विकून टाकले.

सर्पदंशावर हटकून गूण आणणारी एक वनस्पती मध्यप्रांतांतील सेठना संस्थानचे राजपुत्र महाराज कुमार साहेब जसवंत सिंव्ह यांस सांपडली असून ती सर्पदंशावर पुष्कळ वेळ देऊन अनुभव घेतला आहे. ज्यास या वनस्पतीचा अनुभव घेऊन खात्री करून घ्यावयाची असेल ते मला कळवितील तर तिचा उपयोग कसा करावयाचा याच्या माहितीसह ती वनस्पती मी अगदीं फुकट पाठवून देईन व अनुभव कळविल्यास मी त्यांचा आभारी होईन असें त्या संस्थानचे प्रधान मि. एन. एम. खांरी हे प्रसिद्ध करीत आहेत.

चीनचा घेतलेला प्रांत परत द्या अशाबद्दल फ्रान्स जर्मनी व रशिया या तिघांनीं मिळून जपानांस जी एक नोटीस दिली आहे ती जरी नोटीस आहे तरी फार गोड भाषेनें आणि मित्रत्वाच्या नात्यानें अशी लिहिलेली आहे.

फ्रान्स सरकारास हल्लीं एकंदर ३,२०,००;००,००० पौंड कर्ज आहे.

अरुणोदय.

टोकियो येथील 'मइनिकी' पत्र ह्मणतें कीं, इंग्रज जपानशी सलगीनें वागतील तर जपानी प्रजा इंग्रजांशीं चांगल्या रीतीनें वागेल. नाहींपेक्षां ही प्रजा, हल्लीं फ्रांसा बद्दल पूज्यबुद्धि बाळगीत आहे.

अमेरिकेंतील निकारिगवा या प्रजासत्ताक संस्थानांतून एका इंग्रज व्यापाऱ्याला हांकून देऊन त्याची मालमत्ता घेतल्याबद्दल भरून देण्याची ठरलेली रक्कम न मिळाल्यामुळें, इंग्रज सरकारानें त्या संस्थानांतील एका गांवाचा कबजा घेतल्यामुळें, इंग्रजाविरुद्ध तिकडे बंडाळी उठली आहे.

युनायटेड स्टेट (अमेरिका) मध्यें वाशिंगटन येथें वैद्यकीय विषयाच्या पुस्तकांची एक मोठी लायब्ररी असून, तींत एक लक्ष बारा हजार पुस्तकें व दीड लक्ष मासिक पुस्तकें आहेत. सर्व पृथ्वींत ही लायब्ररी मोठी आहे असें ह्मणतात.

विचित्र प्रकार— भिंगाच्या महाराजांच्या मुलाची पहिली बायको निवर्तल्या वरून त्यास दुसरें लग्न करण्याचा महाराजांनीं आग्रह केला. पण ती गोष्ट मुलाला पसंत नसल्यामुळें, त्यानें लग्नाच्या दिवशीं एका घरास आग लाऊन, त्यांत आपण उडी टाकून प्राण दिला. या दुःखकारक प्रकारामुळें भिंगाचे महाराज अमंत शोकाकूल होऊन श्रीक्षेत्र काशी येथें आले आहेत. तूर्त त्यांची मालमिळकत 'कोर्ट आफ वार्ड्स' च्या स्वाधीन झाली आहे.

इंग्रज सरकारचे जाश्ईवजा अमीर, अर्थात जावयाचे चिरंजीव शाहाजादा नसरुल्लाखान यांची पाठवणी मुंबईसही मोठ्या थाटानें झाली. सोमवारच्या बोटीनें ही स्वारी इंग्लंडकडे गेली. तेथील मुसलमानांकडूनही शाहाजाद्यांचा उत्कृष्ट सत्कार झाला. कोठून तरी आनंद असो. इंग्लंडांत थोडेच दिवस राहून, आगष्टांत ही स्वारी परत मुंबईस येणार आहे. श्री. स. वि.

ब्रह्मदेशांत दोघा ब्रह्मी मनुष्यांनीं वाघानें फार त्रास दिला ह्मणून हातांत काठ्या घेऊन त्याच्या मागे लागले व त्यांत एका मनुष्यास वाघानें बरेंच जखमी केलें आहे वाघही पटाईत होता.

पंजाबच्या न्यायमूर्ति जज्ज साहेबांनीं असा ठराव केला कीं नाच ही अनीतीची गोष्ट असून अशा नाचांस फिर्यादी बाईनें दागिने घालण्यांस दिले. ह्मणजे अनीति वाढविण्यास मदत केली ह्मणून तिला कोर्ट कांहीं मदत देऊ शकत नाहीं असा निकाल होऊन दागिने कलावंतिणीस अर्पण झाले.

कामगार.

√ ख्रिस्तांचा दंगाः—मद्रास इलाख्यपैकीं कलुगमलाय नांवाच्या गांवीं गेल्या १४ वे तारखेस हिंदुचो एक मिरवणूक चर्चवरून जात असतां तेथील ख्रिस्ती लोकांनीं इतका भयंकर दंगा केला कीं, ४१५ खून झाले. त्यांत तेथें बंदोबस्तासाठीं आलेल्या डे. कलेक्टराचाही खून झाला, यामुळें यात्रेकरूंस चेव येऊन त्यांनीं दंगेखोरांच्या घरांस आगी लावल्या. त्यांत १० इसमाची आहुती पडली.

क. त.

अमेरिकेंत वर्तमानपत्रांशीं संबंध ठेवणारे व त्याचे बातमीदार वगैरे लोक यांस रेल्वेतून फुकट नेण्याआणण्याची व्यवस्था ठरलेली आहे. ज्ञा. च.

नवीन देशी घड्याळ— लग्न बोधनी नांवाचे नवीन घड्याळ मथुरा येथील सुखसंचारक कंपनीचे म्यानेजर यांनीं तयार केलें आहे. या घड्याळास चावी दिली ह्मणजे सूर्याची मानकळा, लग्नाचा अंश राशी. नवमांश व द्वादशांश हे समजून शिवाय हल्लींच्या घड्याळाप्रमाणें तास व मिनिटें समजतात! अशा प्रकारचे कल्पक आह्मांमध्यें असल्याबद्दल आह्मांस मोठा अभिमान वाटतो. अशा प्रकारचीं घड्याळें यांनीं टाइमपीस, क्लॉक व वाच्च या आकाराचीही तयार केलीं आहेत. आतां देशी घड्याळें वापरणाऱ्यांनाही एक चांगलीच मदत होईल. ज.

हल्लीं या राज्यांत वकीलांचा विशेष सुकाळ झाला आहे. त्यांच्या समूहापैकीं शेकडा८९ लोक लोकांस लुटणारे आहेत असें ह्मणणें भाग पडतें! जितके जास्त वकील तितके जास्त तटे असें जें हरबर्ट स्पेन्सर साहेबांचें ह्मणणें आहे त्याला बहोधाच्या वकिलांनीं सत्यता आणून सोडली आहे तंटे मिटवून इमानानें काम करणारे असे फारच थोडे वकील आढळतील ही वकीलांची टांकसाळ लवकर बंद होईल तर बरें! वि. सा.

मनुष्यानें आपलें मन होतां होईल तों, संभोगाच्या किंवा वीर्यपातकारणाच्या पासून अगदीं दूर ठेवलें पाहिजे. लौकिकभीती, पापभीति, सदाचरण प्रवृत्ति, इत्यादि साधनांनीं मनाला स्वच्छ, शांत व विकाररहित ठेवलें पाहिजे. असें ठेवलें ह्मणजे संतती पुरताच वीर्यपात करण्याची जरूर राहते. व अशाच जरूरीच्या वेळीं वीर्यपात केला ह्मणजे तो सकारण वीर्यपात होतो. एकंदरींत, वीर्यपात करण्याची मर्यादा किती थोडी असून, हल्लीं आह्मी तिचा किती विस्तार व दाणादाण करून सोडली आहे, हें पाहिलें ह्मणजे खचित मोठी शरम वाटल्या शिवाय रहात नाहीं!

आ. भि.

### नोटीसीचे उत्तर.

रा. रा. बाळाजी वा. बाभनाजी मराठी पाटील राहणार मौजें हातल प्रगणें उमरखेड तालुके पुसद जिल्हा वासीम यांस खाली सही करणार बळीराम सदोबा गोर राहणार मौजे पारडी प्रगणें तालुके पुसद जिल्हा वासीम यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी तारीख २२-४-९५ रोजीं वऱ्हाडसमाचारातुन तिसऱ्या पानांतील ४ कालमांत दस्तऐवजा संबंधानें नोटीस दिली आहे त्याचे उत्तर देण्यांत येतें कीं, मौजे पारडी प्रगणें तालुके पुसद येथील सर्वे नंबर ६५-६६-७१ या पैकी व गढींतील जागा वगैरे तुझा हिशा एकंदर ४ आण्याचे हिशा पैकीं सदरहू तुमचा चार आणेचा हिस्सा मालपलही मिळकत रुपये ५०० यास आह्मास पुर्ण खरेदी दिली आहे. भरणा नगदी घेऊन दस्तऐवज नोंदून दिला आहे. भरणा पुसद येथें नगदी दिला आहे. त्या पैकीं एक पै ही आह्मास देणें राहिले नाहीं. तुह्मी विनाकारण त्रास देण्याचे उद्देशानें ही नोटीस दिली आहे तरी सदरहू नोटीसाचा खर्च तुमचे कडून घेतला जाईल. कळावें तारीख ३ माहे ५ सन १८९५ इ.

(सही)

[सही] बळीराम सदोबा गोर दुकान पारडी दस्तुर खुद

### नोटीस.

नोटीस. मनसुकदास देव किसन मारवाडी दुकान मौजे सांवरगांव तालुके जळगांव जिल्हे अकोले यांस.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचे आमचे पत्तीयदेव रुईचा व्यापार संमत १९४९ सालांत झाला त्यात नुकसान आलें त्यात तुमचेकडे घेणें निघाले ते तुह्मास देण्याकरितां दोन चार वेळ मागणी केली असतां आज देतो उद्या देतो ह्मणून ह्मणत गेले त्यास हल्लीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत तुमचे खात्याचा पैसा देऊन आमची पावती घ्यावी असें न केल्यास कोर्ट मार्फत तजवीज केली जाईल. नोटीसीचा खर्च तुह्मावर आहे. कळावें. तारीख ५ माहे पांच सन १८९५ इसवी.

[सही]

(सही) मुलचंद गंगाराम मालक धनालाल टुकडदास दुकान जामोद तालुके जळगांव जिल्हे अकोले. धनालाल.

### कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शद्ब मराठींत व इंग्रजींत (उच्चारासह) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेले किंमत ०।०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.


### घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसाविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोपप्रमाणें, आंकडे ठळक विलायती काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकले नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशिक


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास .... .... .... ०४

Six monthly .. ... 3 ...
Single copy ... ... ... ... 4 as.

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 20 MAY 1895 NO 19

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख २० माहे मे सन १८९५ इ० अंक १९

ESTABLISHED IN 1880.
HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बा. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्द गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कर्डी, लेखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व पकारचे ज्वर, अर्धाशीशि, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा-गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक मालाबरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्ह्याल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्ह्याल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य १२ शके १८१७

मद्रासच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष नामदार आलफ्रेड वेब यांनीं हिंदुस्थाना संबधानें अनुभवसिद्ध लेख लिहिला आहे तो सर्वांनीं पण त्यांत मुख्यत्वेंकरून आंग्लो-इंडियन राज्यकर्त्यांनीं मनन करण्यासारखा आहे. इंडियांतील लोकांचा जीवनकलह व आयुष्यक्रम हीं पाहून मन अगदीं द्रवतें. नामदार वेब ह्मणतात कीं, इंडियन लोक अशा कष्टमय स्थितींत देखील पक्या धैर्याचे, कनवाळू स्वभावाचे, आणि संतुष्ट वृत्तीचे आहेत. इंडियन लोकांस आंग्लो-इंडियन नांवें ठेवितात आणि त्यांचा तिटकारा करितात; पण आगबोटीवर पाहावें तर हेच लोक पुष्कळ कामगार असतात कांकीं ते व्यसनासक्त नसतात आणि विश्वासु व आज्ञाधारक असतात. शिवण्याचीं यंत्रें इंडियांत भाड्यानें दिलीं तर त्या व्यापारांत शेंकडा एक कुळ वाईट लागतें पण ग्रेटब्रिटनमध्यें हेंच प्रमाण दसपट आहे तेव्हां हे लोक किती ह्मणून सचोटीचे मानावे. बाजारांत खेरिदिदाराशीं हे लोक फार खरेपणानें वागतात आणि निर्धास्तपणें याच्या सर्व देववेवी अगदीं साध्यावृत्तीनें चालतात.

अशा सद्गुणी इंडियनामध्यें जो श्रेष्ठ वर्ग आहे त्यांस इंग्रजी राज्यांत कांहीं अधिकार नाहीं किंवा त्यांना कांहीं महत्वाच्या कामगिरी बजवावयाच्या नाहींत हें फार वाईट होय. हे लोक पाणीदार, वजनदार व पराक्रमी आहेत पण त्यांच्या नष्टचर्यानें ते अगदीं हतवीर्य व गलित तृणा प्रमाणें बनले आहेत. आंग्लो-इंडियन अधिकारी त्यांस कसपटा प्रमाणें मानतात. त्यांच्याशीं बेपरवाईनें वागतात व आपल्याच हातीं सर्व सूत्रें राखण्यासाठीं त्यांनीं इंडियनांची पायमल्ली करून सोडली आहे. आयर्लंडात असा प्रकार बहुत आढळतो पण तेथें कोणी तरी लोकांतर्फे वाली निघतो. इंग्लिश लोकांचें व तेंन इतर बाबींत धोरण व सरळपणाचें असतें पण त्यांच्या अंगीं इतकी उद्दामवृत्ती तिरस्कार बुद्धि व मत्सरीपणा हीं कोठून आलीं हें कळत नाहीं. नामदार वेब याच्या मतें एक मुख्य कारण असें कीं इंग्लिश लोकांस गेल्या आठ शतकांत पराभव ह्मणून काय तो माहित नाहीं ह्मणून वैभव शिखरावर उभे असतांना त्यांच्या मनांतील अनुभूति परंपरेनें अगदीं अस्तंगत झाली.

नामदार वेब लिहितात कीं इंडिया व आयर्लंड हे दोन पादाक्रांत देश आहेत आणि कोणीही मला दोष दिला तरी हा उभय देशाची पायमल्ली डोळ्यापुढें सदैव जागेल. इंग्लिश लोकां प्रमाणें आयरिश व इंडियन लोकांस स्वतंत्रता व सारखे हक्क मिळाले नाहींत तोंपर्यंत महाराणी सरकारचे जाहिरनामे पोकळ अर्थाचे राहतील व राजकीय कृतीनें त्यांस हरताळच लागल्या प्रमाणें होईल.

हिंदुस्थानचें घोर दारिद्य नामदार वेब साहेबांच्या डोळ्यापढें मूर्तिवत उभेंच आहे. कामन्स सभेंत पेनशनर आंग्लो इंडियन अधिकाऱ्यांनीं वर्णन केलेल्या इंडियन लोकांच्या श्रीमंती वैभवाचें चित्र कोठेंच दृश्यमान झालें नाहीं आणि त्यांच्या नेत्रांसमोर ज्या गोष्टी आल्या त्या येथील लोकांच्या अगदीं गरिबिच्या व अन्नान्नदशेच्या होत्या. रोजमुरे फार थोडे असतात व वर्षाचे वेतन अगदीं थोडें ह्मणजे माणशी २० रुपये देखील पडत नाहीं पण विलायतेंत माणशीं उत्पन्न इंडियनाच्या वीस पटीहून ज्यास्त असतें. इंडियन लोकांची इतकी कष्टमय स्थिती आहे कीं एक वर्ष वाईट लागलें तर लागलींच उपासमाऱ्याची व मरणाची पाळी येत. या सर्वच गोष्टी बद्दल राज्यकर्ते जबाबदार आहेत असें नाहीं. इंडियनांच्या सामाजिक चाली फार घातुक असल्यामुळें प्रजावृद्धि गेल्या दहा वर्षांत शेंकडा दहा या प्रमाणानें वाढली आणि जीवनकलह अत्यंत दुस्तर व संकटमय होत चालला आहे. इंग्रजी राज्यानें शांतता, सुयंत्र व्यवस्था, व कल्याणप्रद राज्यकारभार इतक्या गोष्टी लाभल्या पण त्याच्या मोबदल्यांत इंडियाच्या पैशाला मोठीच ओढटी लागली आहे. लष्करी अवाढव्य खर्च व कोल्याचाधि पेनशनें यांनीं पुष्कळ पैसा परद्वीपीं दरसाल जात असतो. मुख्य गोष्टी राज्यकर्त्यांनीं संभाळल्या पाहिजेत त्या ह्या कीं युरोपियन आफिसराचे पगार बेतावातांचे असावेत, ज्या जागा नेटिवांनीं भरण्या सारख्या आहेत तेथें युरोपियनांचें घोडें ढकलेलें नसावें, लष्करी खर्च उधळेपणानें न होतां आटवशीर व्हावा, आणि इंग्लंड व इंडिया या मध्यें खर्चाची वाटणी न्यायपद्धतीनें होत नाहीं. याच गोष्टी अगोदर केल्या पाहिजेत ह्मणून सुशिक्षित इंडियन मुत्सद्दी विनंती करित आहेत पण लष्करी व इतर आंग्लो इंडियन यांच्या हिताची बाजू निराळी व विरोधी आहे तेव्हां न्याय कसा मिळेल याविषयीं मोठी चिंता आहे.

इंडियाच्या माहिती संबंधानें विलायतच्या लोकांचे डोळे झाकले ह्मणजे हे अंग्लो-इंडियन अधिकारी आहेत ते सांगतील तीच पूर्वदिशा आणि याच खटपटशाहीनें हा देश पुष्कळ बुडाला. स्टेट सेक्रेटरी यांच्या फौलरच्या भाषणा प्रमाणें कामन्स सभेचे सर्व समासद इंडिया तर्फे समासद आहेत हें खरें तर इंडियन बजेटाचा प्रश्न निघतो तेव्हां हिंदुस्थाना तर्फेचे समासद कोणीकडे अंतर्धान पावतात

हे नामदार फौलर यांस करत नसेल असें नाहीं. वर वर देखील पहाणाऱ्यास समजेल कीं इंडियाचा खजिना इंडियाच्या वैभवासाठीं व राज्यविस्तारा साठीं वाटेल तितका उधळला जातो. चित्रा ळच्या स्वारींत ५४ शिख शिपाई वर्षा पडले तरी चिंता नाहीं पण थोडे इंग्रजी सोल्जर खालीं पडले कीं सर्वत्र चर्चा सुरूं होते. शिवाय इंडियाची स्थिती गरिबीची आहे. नामदार फौलर ह्मणाले होते कीं इंडियन लोकांवर कराचा बोजा थोडा आहे पण इंग्लंडच्या माणशीं वार्षिक ३० पौंड उत्पन्नावर शेंकडा ७½ कर आणि इंडियाच्या माणशीं वार्षिक ३० शिलिंग उत्पन्नावर शेंकडा ५ कर या दृष्टीनें इंडियांतील कराचा भारी बोजा लक्षांत येईल.

पूर्वीं इंडियास कोणी आला ह्मणजे तीन महिन्यांच्या प्रवासानंतर तो पोहचे आणि त्या जाण्यायेण्याच्या गैरसोयीमुळें आंग्लो इंडियन इकडे मन रमवून येत व सहजेंच इंडियनांशीं मित्रभावानें मिळून मिसळून वागत. पण अलिकडे हा पूर्व संबंध लयास जाऊन द्विधाभाव व फाटाफूट उत्पन्न झाली आहे.

कायदे कौन्सिलांतून पुष्कळ इंडियनांचा प्रवेश झाला पाहिजे आणि उदार तत्वावर राज्यकारभार चालविला पाहिजे आणि या कामीं राष्ट्रीय सभा सरकारास उत्तम प्रकारें लोकमत विदित करीत आहे.

---

राष्ट्रीय सभेचा प्रभाव मोठा अगाध आहे गेल्या दहा वर्षांपासून हिंदुस्थानच्या खजिन्याच्या गैर व्यवस्थेबद्दल जो ओरड चालू आहे तिची अखेर थोडी बहुत दाद लागली. सिव्हिल व लष्करी खर्च फार अवाढव्य आहेत आणि त्याच्या विस्ताराला कोठेंच आळा नाहीं. आणि त्याच प्रमाणें इंग्लिश राज्याचा वैभवासाठीं जो राज्यविस्तार केला आहे त्याचा खर्च इंडियावर लादतात व विलायतेंत इंडियाच्या नांवानें पुष्कळ वि ाकारण खर्च होतो. या तक्रारी व अडचणी राज्यकर्त्यांच्या नजरेस पूर्णपणें आल्या आणि ह्मणून या प्रश्नाच्या खऱ्या चौकशीसाठीं एक रायल कमिशन लार्ड वेल्बी यांच्या अध्यक्षते खालीं नेमण्यांत आलें आहे. कमिशनमध्यें पुष्कळ गृहस्थ आहेत त्यांपैकीं नामदार वेडरबर्न, केन व दादाभाई असे तिघेजण इंडियाचे निस्सीम पुरस्कर्ते आहे ही अत्यानंदाची गोष्ट होय. बाकीची मंडळी बरी किंवा वाईट आहे हें कांहींच सांगवत नाहीं ईश्वर करो आणि आमच्या खऱ्या मागण्यांचा योग्य विचार होवो.

---

## हिंदुस्थानची राजनीति

[ १६ अं. व. पुढें चालूं ]

६ अपात्र अधिकाऱ्याचा गौरवः—

एखादा अधिकारसंपन्न पुरुष मृत झाला असतां याची मित्र आणि भक्त मंडळी, मृताचें स्मारक करण्याबद्दल आग्रह पूर्वक लोकांची विनंती करितात. अशा वेळीं मृताच्या विरुद्ध टिका करण्याचे कपाळीं येऊन ह्या लोकांचें ह्मणणें अयोग्य आहे असें प्रतिपादन करण्याची पाळी आपल्यावर यावी हीं खरोखर फार दुर्दैवाची गोष्ट आहे! परंतु एखादा मनुष्य दुर्वृत्त असून त्यानें साधुत्वाचा बाह्य वेश मात्र धारण केला असेल अथवा तो अंतर्यामीं भ्याड असून, त्यानें वीरश्रीचा व्यर्थ आव मात्र अंगीं आणला असेल. अशा पुरुषांचें स्मारक करण्याबद्दल जर त्याची सहाध्यायी आणि अनुयायी मंडळी प्रयत्न करीत असतील तर अशा वेळीं त्या मृताची वास्तविक योग्यता काय होती ती स्पष्ट रीतीनें जगापुढें मांडून ह्या लोकांच्या प्रयत्नास अडथळा आणणें हें प्रत्येक व्यक्तीचें धार्मिक अथवा सामाजिक कर्तव्य कर्म होय.

७ सरकारची सत्यापलाप करण्याची पद्धतः— राजकारणाबद्दल जबाबदार असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांनीं मिथ्या काळजीपूर्वक दूरवर दृष्टी देऊन प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रांच्या अधारावरूनच आपण एखाद्या राजकारणाची हकीकत लिहिली असतां, राज्यकर्त्या लोकांच्या वर्तना संबंधी जे निर्णय त्या हकीकतीवरून ठरतील आणि तिजवरून जीं इतिहासदृष्ट्या प्रमाणें सिद्ध होतील त्यांचें स्वरूप किती तरी सौम्य दिसेल! राजकारणांचा विचार करण्याकरितां गुप्त रीतीनें भरलेल्या कौंसिलांतील वादविवादाविषयीं प्रसिद्ध झालेल्या टांचणांत, काउन्सिलांतील झालेला सर्व वादविवाद टांचला गेला आहे; "ब्लु बुकांत" प्रसिद्ध झालेला मजकूर ईश्वर प्रेरित कथना प्रमाणें सर्वांशीं खरा आहे आणि पांच डोई एकत्र मिळून सिद्ध झालेल्या काउन्सिलांचा निर्णय भविष्यवाद्याच्या वचनाप्रमाणें प्रमादाक्षम्य आहे असें आपण मानल्यावर मग राजकारणा संबंधी टीका करण्यास कांहींच जागा उरणार नाहीं!

८ राज्यकारभार चालविणारा "श्वेत भट्टांचा वर्गः— प्रत्येक धंद्यांतील लोकांस स्वीकृत धंद्याबद्दल अभिमान असतो अशाच तऱ्हेच्या अभिमानास वश होऊन प्रत्येक खात्यांतील वेगवेगळे अधिकारी, आपआपल्या खात्याचें महत्व व योग्यता फुगवून दाखवितात आणि होईल तितकें करून आपले अधिकार वर्तुल जितकें जास्त विस्तृत करवेल तितकें करण्याकडे त्यांची प्रवृत्ति असते. पूर्वी सिव्हिलियन लोकांना भरपूर पगार मिळे. त्यांच्याशीं सरकारानें केलेल्या करारावरून त्यांस एक प्रकारचें स्वातंत्र्य प्राप्त होऊन त्यांच्या माथीं कोणत्याही प्रकारची जबाबदारी नसे. कायद्यांतील कलमान्वयें त्यांस सवलती मिळालेल्या होत्या. "इस्ट इंडिया कंपनीचे" भागिदार व व्यवस्थापक लोकांशीं त्यांचा आप्तपणा असून त्यांच्याशीं वारंवार शरिरसंबंध घडून येत असे. या कारणांमुळें सिव्हिलियन लोकांची त्या काळीं एक वेगळीच जात बनून राहिली होती. इतिहासांत आज पर्यंत नमूद असलेल्या सर्व परंपरागत अधिकारसंस्थेपेक्षां ही सिव्हिल सर्विस संस्थां अत्यंत मबळ आणि मानी होऊन गेली. कुंपनी सरकारची सत्ता लयास जाऊन सिव्हिल सर्व्हिस परिक्षा उदयास आली तेव्हां पासून शिफारशीनें सिव्हिलियन करण्याची पूर्वीची पद्धत बंद झाली ह्मणून ह्या संस्थेची देदीप्यमान प्रभा कांहीं अंशीं कमी झाली आहे, तथापि हल्लीं देखील प्रत्येक खात्याचें नियमन वास्तविक रीत्या ह्याच लोकाकडुन होतें. न्यायाधीशाची, फडणीसाची आणि राज्यसूत्रचालकाची (administrative ] हरएक महत्वाची जागा ह्याच लोकाकरितां राखून ठेविली आहे, इतकेंच नसून, युरोपियन राष्ट्रांतील प्रधानकीच्या दर्जाच्या योग्यतेच्या सर्व जागा ह्याच लोकांस दिल्या जातात. ह्या राज्याधिकारी वर्गांशीं साम्य पावेल अशी दुसरी संस्था भूतलावर कोठेंच नाहीं. मग ती चीन देशांत मात्र असल्यास न कळे! अशा ह्या अश्रुतपूर्व वर्गांतील प्रत्येक व्यक्तीची मनःप्रवृत्ति स्वतःचें स्तोम माजविण्याकडे असते. स्वतंत्र राष्ट्रांतील लोकांच्या वर्तनक्रमावर त्यांच्या सामाजिक रीतिभातीचे कांहीं अनिष्ट परिणाम घडून येतात ह्या अनिष्ट परिणामांनीं युक्त असे जर ह्या लोकांचें वर्तन असेल तर स्वतःचें देव्हारें माजविण्याची ही त्यांची मनःप्रवृत्ती विशेष निंद्य समजली पाहिजे. ह्या परकीय श्वेत भट्टांना उच्च प्रतीचें उदार शिक्षण मिळालेलें असतें. आणि ज्या लोकांवर त्यांना राज्य करावयाचें आहे ते शिक्षणाच्या कामीं मागसलेले आहेत. जेते आणि जित ह्यांची परस्पर रीतभात, अभिरुची, भाषा, धर्म यांत जमीन अस्मानचें अंतर असल्या कारणानें ह्या उभय वर्गांचा एकमेकांशीं कोणत्याही प्रकारचा संबंध नसतो. फक्त सरकारी कामा संबंधी पडेल तेवढाच काय तो. असा वास्तविक प्रकार असल्या कारणानें त्यांच्या ह्या स्वोत्कर्ष प्रवृत्तीचें स्वरूप तर नीच होत जातें. याचा स्वाभाविक रित्या असा अपरिहार्य परिणाम होतो कीं, ह्या लोकांना स्ववर्गियांच्या मता शिवाय इतर जनपदाच्या मताची बिलकूल पर्वा नसते.

---

# The Berar Samachar

MONDAY MAY, 20, 1895

---

"Study well your political lessons and revise them as often as you will'—this is in short the substance of the advice given by the Hon'ble Mr. Justice Ranade at the last Poona Elocution-gathering. A faithful student of Indian politics will do credit to himself if he inwardly digests the proceedings of the Nationnl Congress. The National Congress is the school where one should be a learner of the first type. The best and noblest sons of the land are the teachers who are never sparing in their lectures. A wide awakening to national existence is felt all over the country and the masses realize in a more or lese degree the great political changes that we are passing through. A transitional stage we have reached in the history of the nation and the grand political religion of which the Hon'ble Mr. Dadabhai Navaroji is the priest, exacts of us a devoted loyalty to the British throne and an onward march in the control and administration of our country.

The recent Provincial Conference at Belgaum reminds us of the rapid spread of political education amongst the masses. The most able and learned address of the President Mr. D. E. Wacha gives one a bird's eye-view of the present situation and brings into prominence the grand problem of Indian finance. His solution is in short as follows:—

"The practical measures required for placing Indian finance on a sound and prosperous footing are:—(1) A slow reduction of the Civil and military expenditure of the empire—an expenditure more adapted to the poorer condition of this country than a costly organization suited to States of the West; more extensive employment of native agency; a stable sinking fund for the reduction of the public debt; a rigid policy of incurring all State liabilities in silver; and last though not least an improved method of husbandry with liberal State aid."

We are persuaded to quote the last portion in which the President concludes his address because the conclusion is so inspiring, straight-forward and convincing that no one can help committing it to memory as a watchword for future guidance. Mr. Wacha remarks:—

"This, then, is the paramount duty of our rulers. To neglect it can only be construed as culpable and dangerous blindness. That the bureaucracy, which is really the master of the situation, will offer uncompromising opposition, is, of course, a forgone conclusion. But a firm and sagacious government which considers its solemn duty to conserve the interests of those whose destinies Providence has placed in its hands must neither look to the right nor to the left. Its course is straight. It has one goal to reach. It has but one duty to perform and that duty, the contentment and welfare of the people. But in order to stimulate the Government to action the motive power of public opinion is necessary. It is the public opinion of England with which we should strenuously endavour to bestir the Government to rise to the height of the occasion and discharge its duty. Indians will never succeed in the reform they so ardently wish for, till the public opinion of England is educated on their side. But, if the Government has to be called to discharge its duty, it is equally our paramount duty to do everything in our power which shall fulfil our aim and object. As the gifted author of "New India" has observed, the "problem is the systematic encouragement of the aspirations and spontaneous tendencies of the Indian people. A constructive is needed which shall not only guide and control events during the period of transition but shall also when necessary abstain from interference. The difficulty is to pass from the old to the new order without disturbance." We have never been slow to recognise the boon which British rule has conferred on us in the past. But we cannot be eternally singing hallelujahs in praise of it. We must consider the present and the future. Let it be our duty to assist the Government in realising a higher and loftier ideal. We have a good government. But the good is not unmixed with much that is positively evil. We are now clamouring that that evil may be removed, so that we may be led from a good to a better government and thence to the best in the fulness of time. The Liberal statemanship of the century has infused new life into us. It has made the national pulse to throb quicker. It has raised aspirations which can never be allayed till they are reasonably satisfied. The Government is therefore bound not to shrink from the responsibilities which properly belong to it. Then alone will the discontent and unrest now so rife in the country will cease. Then alone will con-

tentment prevail. Then alone the stability of the empire will be assured. Then alone will it be enabled to hurl back foreign invasion with all India at its back from whatever quarter it may come. There is a Providence watching the destinies of India. May that Providence inspire our rulers with wisdom and judgment to add another but brighter and purer page to the History of this great country. In the eloquent words of Macaulay, let that History record in the maturity of time that the British found a nation sunk in the lowest depths of degradation, ignorance and superstition and raised it to the highest pinnacle of freedom and civilization which it was in their power to confer."

## वऱ्हाड

हवामान— वारा सोसाट्याचा वाहतो. ऊनही खुप तापतें. परंतु गेल्या दोन दिवसापासून हवेंत पुष्कळ फरक पडला आहे आणि किंचित् थंडावा वाटतो. पटकीचा उपद्रवही सुरूं आहे पण तिचा फैलाव फारसा नाहीं.

रा. रा. रामचंद्र अंबादास, नायब तहशीलदार मुर्तिजापूर यांस अकोल्यास तहशिलदारीवर नेमलें.

आणि मि. अबदूल कादर कारकून डेपुटी कमिशनर कचेरी यांस मूर्तिजापुरास नायब तहशीलदार नेमिलें.

येथील ख्रिश्चन मिशन मधील एक मनुष्य एका मुलीवर लुब्ध होता पण ती त्याच्याशी लग्न लावण्याचें कबूल करीना ह्मणुन त्यानें बचनाग खाऊन आत्महत्या करण्याचा यत्न केला परंतु येथोल डाक्टर दुर्गया पिले यांनीं उत्तम औषधोपचार करून त्यास मृत्यूच्या दाढीतून काढिलें.

एका दादाजी भोज नांवांच्या पेनशनर पोलीस कानस्टेबलनें बायको दारूला पैसे देत नाहीं ह्मणून मारहाण केली त्या व संतापांत स्वतावर बंदुक झाडली बिचारा प्राणास मुकला.

मेहेरबान हेअर साहेब लोकांच्या आरोग्याबद्दल फार काळजी वाहतात. उन्हातापांत गांवभर फिरतात व लोकांच्या पाण्याबद्दलच्या सोयी आपल्या डोळ्या देखत करून घेतात. अशा कनवाळू साहेबांचा महिमा खरोखर थोर होय. त्यांच्या गैरसमजामुळें चुका घडल्या तरी ते चूक कळताच तावडतोब दुरस्त करितात हें पाहून लोक फार खुष आहेत.

ज्या नेटिवांस योग्यते प्रमाणें मोठे अधिकार मि. ह्यौडन यांनीं दिले त्या पैकीं रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ जोशी असिस्टंट कमिशनर हे एक आहेत. राजश्री नानासाहेब यांस आतां सिंकदराबादचे बझार सुपरिन्टेंडेंट नेमण्यांत आलें आहे. हा हुद्दा नेटिवास पहिल्यानेंच मिळण्याची संधि मि. ह्यौडन यांच्या योग्य नेमणुकीमुळें लाभली हें कळविण्यास आनंद वाटतो.

गेल्या सोमवारीं अलिशान रेसिडेन्ट कर्नल मेकेंझी सी. आय. ई. यांनीं निजाम सरकारास थोरली मेजवानी दिली. मेजवानी दरबारच्या थाटावर होती. निजाम सरकार व रेसिडेन्ट या उभयतामध्यें इतकें चांगलें आहे हें अत्यंत आनंदकारक होय.

भयंकर खून— गेल्या गुरुवार रात्रीं आठ वाजण्याचे सुमारास जळगांवास एका पानतांड्यामध्यें कांहीं लोक घुसले आणि त्यांनीं तेथील मालक जो वारी होता त्यास मोठ्या क्रुरतेनें हाल हाल करून मारलें. त्या चांडाळाच्या तडाख्यांत त्याचा साळदार गडी सां पडत होता पण त्यानें गावांत धूम मारिली आणि गांवकरी जाऊन त्या मळयांत पाहतात तों त्या इसमाचें प्रेत विहिरींत सांपडलें.

वरील खुनाच्या प्रकारचे दोन खून झाले. लेमुडई अठ दहा दिवसां पूर्वीं तामगांवच्या पोलीस खेडेगांवांत आढळल्याचेंही ऐकण्यांत येतें. वेळ मोठी बिकट दिसते.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होते तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठी सरटेफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें (वर्ग १९) दि. की. मि. नंबर ९

१८९५

डिपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव चिमणाजी

बापाचे नांव सोनाजी कुणबी

राहणार वणी तालुके एलिचपूर

जिल्हा एलिचपूर यांस मयत

श्रावण बापाचें नांव कृष्णाजी राहणार वणी तालुके एलिचपूर यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख २० माहे जुन १८९५ इसवी रोजीं अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत चिखलदरा अगर स्वारी असेल तेथें हजर होऊन आपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २९ माहे एप्रील सन १८९५ इ०

H. Godwin Austen
Offg. Deputy Commissioner.
दि० जजत एलिचपूर.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट नंबर ७ प्रमाणें (वर्ग १९) दि. की. मि. नंबर ४

१८९५

दिपुटी कामिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव— पानाई व राधाबाई जवजे रुपचंद गुजराथी

राहणार गणेशपूर प्रगणे अंजनगांव

तालुके दर्यापूर

जिल्हा एलिचपूर यांत मयत.

रुपचंद बापाचें नांव भिकाजी गुजराथी राहणार गणेशपूर प्र० अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हा एलिचपूर यांचें कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणुन सदर्हू अर्जदार यांनें अर्ज केला आहे त्याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणुन ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येते आहे कीं त्यांनीं तारीख १० माहे जून सन १८९५ इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत चिखलदरा अगर स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

ता० २९ माहे एप्रील सन १८९५ इ०

H. Godwin Austen
offg. Deputy Commissioner
दि० जजन एलिचपूर.

नोटीस.

नोटीस खाली सही करणार यांजकडून बिसनराम शंकर मारवाडी मैत वारीसदार बायको लाड मर्द शंकर मारवाडी दुकान कसबे सोनाळे तालुके जळगांव जिल्हे आकोले यांस

तुह्मास नोटीस देण्यांत येतें की तुमचेकडे आमचे दोन दुकानचे भाडे हल्ली तुह्मी राहता ते व संवत १९५० साळांत तुह्मी आमचे जवळून कापुस घेतला त्यांत तुह्मीं दिले रुपये बाकी तुमच्या खात्यात एकंदर भाड्या सुद्धां राहिलेले रुपये आठ दिवसाचे आंत देऊन आमची पावती घ्यावी असे जर न झाल्यास रिती प्रमाणें कोर्ट मार्फत व्यवस्था केली जाईल नोटीसीचा खर्च तुमचेवर आहे कळावे. तारीख १९ माहे मे सन १८९५ इ.

(सही)

[सही] मुळचंद गंगाराम मालक घनाळाल टुकडदास तर्फे मुखत्यार नारायण नागेश द. खु.

नोटीस.

नोटीस रामवल्लभ सवईराम दुकान सोनाळे तालुके जळगांव जिल्हे आकोले यांस मुळचंद गंगाराम मालक घनालाल टुकडदास दुकान सोनाळे तालुके जळगांव जिल्हे आकोले यांजकडून

नोटीस देण्यांत येते कीं तुमचेकडे आमचे कपासीचें रुपये घेणें आहेत त्यांत कांहीं चिल्हर तुह्मी वसुल दिला तो जमा आहे बाकी राहिलेले रुपये आठ दिवसाचे आंत व्याजा सुद्धां देऊन आमची पावती घ्यावी असे जर न केल्यास रिती प्रमाणें कोर्ट मार्फत व्यवस्था करण्यांत येईल नोटीसीचा खर्च तुमचेवर आहे कळावे ता. १९ माहे मे सन १८९५ इ.

नोटीस

रा. रा. मुळतानचंद मोतीराम गांधी मारवाडी मुक्काम पोकरण जिल्हे जोधपूर यांस:—

सरदारमल्ल तेजमल दुकान खामगांव मालक पन्नालाल सरदारमल राहणार खामगांव यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं:—

(१) तुह्मी आमचे खामगांवचे दुकानचे पूर्ण वहिवाटदार मुनीम व कुलमुखत्यार होता. तुमचा मुनीमपणा व कुलमुखत्यारी मी यापुढें रद्द केली आहे तर तुह्मी दुकाना संबंधानें सर्व व्यवहार बंद ठेवावे.

(२) तुह्मी दुकानाचा मुनीमपणा पतकरल्या तारखेपासून आजवर तारखे पर्यंतचे सर्व हिशेब समजाऊन देऊन सर्व वह्या व कागदपत्र, परत आमच्या ताब्यांत द्यावी.

(३) तह्मी देशांत जाते वेळीं येथून माझ्या परवानगी शिवाय गुप्त रीतीनें कांहीं कागदपत्रें व वह्या घेऊन गेला आहा. शोधान्तीं त्यापैकीं वह्या कागदपत्र तुह्मी नस्ताबदलचे आडवांत आले ते येणें प्रमाणें.

[अ] व्याजवही संवत १९४९-५०-५१ बद्दल तीन

[ब] गहाणखत-ऋणको-यशवंतराव नारायण देशमुख जळमकर रुपये ५७०० चें

[क] कोरे जनरल स्टांप

| किंमत | स्टांपाची संख्या |
|---|---|
| ३० | १ |
| २० | १ |
| १० | १ |
| १० | २ |
| | प्रत्येकी पांच रुपयांचा |
| ६ | ३ |
| | प्रत्येकी २ दोन रुपयांचा |

हे वर नमूद केलेलें कागदपत्र व त्याशिवाय जे इतर असतील ते नोटीस पोंचल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत परत करावें.

(४) तुह्माकडे तुमचे खानगी खात्या वरून जे रुपये दुकानचे घेणें निघतात ते अद्याप दिले नाहींत. तर त्यांची आदाई आठ दिवसांत व्हावी. नाहीं तर त्या तारखेपुढें पैसा बिनाकारण अडकिवल्याबद्दल दरमहा १॥ दीड रुपया प्रमाणें व्याज घेतलें जाईल.

वर चार कलमी नोटीसीनें कळविल्याप्रमाणें तावडतोब व्यवस्था झालीच पाहिजे न झाल्यास मला दिवाणी फौजदारी जी करणें तुमच्या मुळें भाग होईल तिचा खर्च या नोटिशिच्या खर्चां सह तुमचे कडून भरून घेतला जाईल' कळावें तारीख १७ माहे मे सन १८९५ इ.

(सही)

पन्नालाल सरदारमल तर्फे
रुपचंद लक्ष्मण दस्तुर
खुद.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते की सरदारमल तेजमल दुकान खामगांव या नावांचे दुकानचा मुनीमपणा व कुलमुखत्यारी रा. रा. मुळतानचंद मोतीराम गांधी यांजकडे होती त्यांस दुकानच्या कामावरून काढण्यांत आलें आहे. या उपर कोणी ही त्यांच्याशी दुकाना संबंधानें व्यवहार करूं नये. जर कोणी व्यवहार करील तर त्याची जबाबदारी त्याच्याच माथीं राहील आणि आह्मी स्वतः किंवा आमची इस्टेट कोणत्याही प्रकारें जबाबदार राहणार नाहीं कळावें तारीख १७ माहे मे सन १८९५ इ.

(सही)

पन्नालाल सरदारमल तर्फे
रुपचंद लक्ष्मण दस्तुर.
खुद.

## वर्तमनसार.

काळ हा अनंत व अमर्याद खरा पण जरूरीच्या कामाला जायचें असून दोन अ-र्धांच मिनिटांत आगगाडी गांठावयाची असली, ह्मणजे काळ अत्यंत आकुंचित वाटतो.

जगांत सगळ्यांत अतिशय थंड असें स्थान ह्मटलें ह्मणजे रशिया देशांतील याकुच हें होय. त्या ठिकाणी पारा केव्हां केंव्हा शून्य अंशाच्या खालीं ७३ अंशापर्यंत जातो !

करमणूक.

मध्यप्रांतांतील दमो जिल्ह्यांत भयंकर दुष्काळ पडला असून पुष्कळ लोकांना अन्न मिळेनासें होऊन ते पटापट मृत्युमुखीं पडत आहेत. अन्नाच्या अभावीं मनुष्य दीन होऊन त्यांच्याकरतां वाटेल ते करण्यास सिद्ध होतो अशी संधी पाहूनच कीं काय, ख्रिस्ती धर्म प्रसारार्थ वाटेल तसलीं ढोंगें करणाऱ्या पण अलीकडे हताश होऊं लागलेल्या ख्रिस्ती भटांनीं मोताद झालेल्या दुष्काळ पीडीत लोकांना बाटविण्याचा सपाटा चालविला आहे.

न्या. सिं.

हिंदुस्थानच्या तिजोरीची स्थिति किती असमाधान कारक, काळजीची व नाजूक आहे हें सर्वत्र मशहूर असून, त्या तिजोरीवर आगंतुक अनवश्यक व मिजाशी खर्च सरकार आपल्याकडे का घेतें हें आह्मास कळत नाहीं. अमिरास १२ लाखांची नजर दरसाल आमच्या सरकाराकडून सरहद्दीच्या संरक्षणार्थ पोंचत असून त्यावर त्याचे कुटुंबांतील मंडळीच्या अमिरी थाटाचे प्रवासाचेही खर्च आमच्या सरकारानें सोसावे, यांतील तत्व काय आहे तें आह्मास समजत नाहीं.

कल्पतरु

तुरुंगांतून सुटणाऱ्या कैद्यांस चांगल्या मार्गास लाऊं इच्छिणारी जी एक मंडळी स्थापन झाली आहे. तिला ब्रिटिश इंडिया असोसिएशनच्या तर्फे अयोध्याच्या महाराजांनीं ५,००० रुपये देणगी ह्मणून दिले असें समजतें. हें सत्पात्रीं दान आहे.

सुरत कलेक्टर मि. लेली यांस लांच देवूं केल्याबद्दल नेटिव बारिस्टर नसरुल्लाखान यांस झालेली शिक्षा हायकोर्टानें रद्द करून त्यांस निर्दोषी ठरविलें व त्या बद्दल सर्व नेटिवांस आनंद होईल.

उमरखानास शिफाई साळर यांणें कैद करून काबुलास पाठवून दिलें व महमद शहाखान यासही तिकडे पाठविण्याचा हुकूम झाला.

फोर्मोसा बेटावर जपानचा ताबा कबूल करण्यास फ्रान्स तयार नाहीं असें ह्मणतात.

बंगाल व उत्तर हिंदुस्थान यांत गेल्याच्या मागच्या शुक्रवारीं कित्येक तासपर्यंत सारखा पाऊस पडत होता. हवा अगदीं गार झाली,

विजेच्या सहायानें चालणारी मद्रास येथील टामवे तयार होऊन उतारूंस इकडून तिकडे नेण्याची सुरवात झाली.

ता. ९ रोजीं खांडव्यास फार मोठें तुफान झालें. बाजारकऱ्यांचीं पालें पतंगाप्रमाणें उडून गेलीं व धान्याच्या राशींतील धान्य धुरळ्याप्रमाणें उडून लोकांस फार त्रास झाला. पुष्कळ झाडेंही पडलीं.

मंवंडच्या लढाईंत शूरत्व गाजविलेला काबुलच्या माजी अमीर अयुबखान हा हल्लीं रावळपिंडीस राजकीय कैदी ह्मणून आहे त्यास तेथून काढून मद्रासेस नेत आहेत. अगदीं रास्त आहे. मद्रासची हवा अयुबखानास दाखविलीच पाहिजे व रावळपिंडीची जागा शेर अफजूल यास हवीच आहे.

माडागास्करवर गेलेल्या फ्रेंच फौजेनें मारोवो ठिकाण आपल्या ताब्यांत घेतलें. त्यांत होवा लोकांचें फार नुकसान झालें. तेथें जे हिंदुस्थानचे लोक आहेत ते व त्यांची माल-मिळकत सुरक्षित आहे

अरुणोदय

१८९९ च्या नोवेंबर महिन्यांत एक शेपटाचा धूमकेतु दिसून, त्यावेळीं पृथ्वीचा नाश होईल असें युरोपांतील एका खगोलवेत्यांनीं भविष्य केलें असून, ते खोटें आहे आहे असेंही कित्येक ह्मणतात. व हा मोठा वाद चालला आहे.

श्रीस. वि.

अमेरिका स्वतंत्र होतांच फ्रान्सानें दास्यपाश तोडण्यासाठीं जे प्रयत्न केले तसे हिंदुस्थानानें करण्याची हाव ठेऊं नये. कारण महाराणीच्या छत्राखालीं हिंदुस्थान आरामांत आहे. फक्त त्यांत फरक इतकाच केला पाहिजे कीं नवीन कामगार स्वच्छंदीपणानें वागून आपल्या अमलाचि व अंमलपणाची हाऊस पूर्ण करून घेतात तितकी मोकळीक त्यांस घेऊं देऊं नये ज्या लोकांस राजाच्या कहरी प्रसंगानें प्रत्येक घटका मृत्युस्वरुपी भासत असेल त्यांनीं जपानचा आजकालचा इतिहास वाचण्याची शिफारस करतों.

म० मि.

यंदा राष्ट्रीय सभेंचे मंडपांत सामाजिक परिषद भरूं द्यावी कीं नाहीं ! हा प्रश्न कांहीं पुणेंकर मंडळीनें पुढें आणिला असून त्याकरितां एक टोलेजंग सभा भरविण्याचा विचार असल्याचें कळतें. हा कलहमूलक प्रश्न असून तो पुढें न येईल तर बरें होईल.

सर्पदंश झालेल्या जागेचे वरील बाजूस घट्ट बांधून जळवा लावाव्या, ह्मणजे जळवा मरून पडून विष उतरतें, असा वायव्य प्रांतांत आलेला अनुभव वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाला आहे.

जमिनदारांस फटके– 'बिहार हेरल्ड' पत्रावरून कळतें कीं, मि. व्हिलर नांवाच्या तरूण माजिस्ट्रेटांनीं एका युरोपियन बागवानाच्या फिर्यादी वरून १५ वजनदार जमिनदारांस तुरूंगाच्या शिक्षा न देतां बुध्या फटक्यांच्या शिक्षा देऊन त्यांची दुर्मत वेतल्याची बातमी आहे. ज्ञ. शो

पोलिससूपरिंटेंडेंटांचा खून– पंचमहालचे पोलिससूपरिं. मि. लेस्टर यांचा मुक्काम ता० ८ रोजीं एका डोंगरावर असतां त्याच्या मडमेनें गोळी घालून त्यांचा खून केला ! किती विलक्षण प्रकार हा ! मि. लेस्टर यांचा व त्यांच्या मडमेचा गृहकलहावरून बेबनाव झाला होता; ह्मणून त्या बायकोने आपल्या नवऱ्याचा प्राण घेतला. सुधारलेल्या युरोपियन लोकांत हें भयंकर कृत्य झाल्यामुळें लोकांला विशेष आश्चर्य वाटण्यासारखें आहे. खुनी मडम गुन्ह्यास कबूल असून तिला तुरुंगांत ठेवेली आहे व ता. २३ रोजीं चौकशी चालणार आहे असें समजतें. मयत मि. लेस्टर हे पूर्वीं कांहीं दिवस सावंतवाडी येथें पॉलिटिकल आफिसर होते.

स. शो.

---

नोटीस

राहिमखा वल्द वजीरखा फकीर हल्लीं वस्ती अकोला यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देणार येते कीं हल्लीं माझ्या ताब्यांत असलेली हवेली अगरवेशी जवळ आहे ती तुह्मी विकण्याच्या किंवा गहाण वगैरे ठेवण्याच्या लटपटींत आहां पी हवेली माझ्या पूर्ण मालकीची असून माझ्याच वहिवाटींत आहे. तिच्यावर तुमचा कांहीं एक मामला चालणार नाहीं. त्या हवेली संबंधानें तुह्मी व्यवहारानें कांहीं देवघेव कराल तर ती गैरकायदा व बातल आहे अशी समजली जाईल. आणि तुमच्या खोट्या व्यवहारानें माझें जें नुकसान होईल तें या नोटीशीच्या खर्चासह कोर्ट मार्फत भरून घेतलें जाईल.

जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं जो कोणी त्याच्याशी व्यवहार करील तो स्वता जबाबदार राहील आणि त्याचा हक्क हवेलीवर कोणत्याही प्रकारें तिळप्राय पोंचणार नाहीं. कळावें. ता० १२ मे सन १८९५ इ०

सही

सुजानबी मर्द महिबुबखा राहणार अकोला

निशाणी बांगडी..

---

नोटीस.

मेहेरबान आदमजीभाई कच्छी गणी आवा कच्छी या दुकानचे वहिवाटदार वा अकोलें, यास रघुनाथदास रामप्रताप दुकान अकोलें याकडून. तुह्मी आमचे दुकान खालीं असतां त्यांत आह्मास न विचारितां माल भरला आहां याकरितां ही नोटीस देतों. नोटीस पावतांच दुकान खालीं करून द्या. न केल्यास घराविषयीं आगळीक केल्याची फिर्याद करूं. आणि जितके दिवस तुह्मी आपला माल ठेवाल तितके दिवस दररोज रुपया एक प्रमाणें भाडें व या नोटीसीचा खर्च तुह्माकडून दिवाणी मार्फत वसूल करूं. ता० १४ माहे मे सन १८९५ इ०

(सही) रामप्रताप रघुनाथदास दुकान अकोलें दस्तुर खुद्द.

---

'SIMULTANEOUS EXAMI NATION.

Notice of Motion
The House of Commons
1895

Mr. Naoroji—Civil Service (India) (Simultaneous open Competitive Examinations in England and India), —That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of British Power, the loyalty, confidence, contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to increase largely commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these Proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd. June 1893, viz: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations in both Countries being identical in their nature, and all who compete being finally classified in one list according to merit.

हिंदुस्थानांत ब्रिटिश अम्मल चिरस्थायी करण्यासाठीं, हिंदुस्थानांतील लोकांची राजनिष्ठा विश्वास आणि संतोष कायम ठेवण्यासाठीं त्यची औद्योगिक आणि नैतिक स्थिति सुधारण्यासाठीं आणि त्याचे योगानें ब्रिटिश संयुक्त राज्याचा फायदा करण्यासाठीं, १८३३ च्या कायद्यांतील, बंडा नंतरच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यातील, १८७७ च्या दिल्ली-दरबारच्या व. १८८७ सालीं जुबिली दरबारच्या वेळीं दिलेलीं वचनें पाळली पाहिजेत आणि १८९३ च्या जून्या ३ ऱ्या तारखेस सिव्हिलसर्व्हिस परिक्षा इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत एकसारखी घेत जावी असा जो ठराव आपण पास केला तो अमलांत आणिला पाहिजे."

---


कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत ( उच्चारासह ) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेले किंमत ०१०

गोविंद भास्कर ओक

वाशिम, वऱ्हाड.

घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनारी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच माल पर्यंत मुलींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

दिवाणी दावा नंबर १८८

१८९२

विद्यमान सिव्हिल जज्ज साहेब बहादूर जिल्हा उमरावती यांचे कोर्टांत

| | |
|---|---|
| श्रीराम मोतीराम खत्री राहणार तऱ्हार हल्लीं राहणार उमरावती | वादी |
| मि. देवराव बाळकृष्ण जात ब्राह्मण जज्य स्माल काज कोर्ट तऱ्हारे | प्रतिवादी |

दावा रुपये ११००

मी सदरील वादी कळवितों तें येणें प्रमाणें:—

१ तारीख १८।१।९२ इ० रोजी प्रतिवादीनें मे० डेप्युटी कमिशनर साहेब जिल्हा अकोलें यांजकडेस रिपोर्ट केला त्यांत वादी विरुद्ध खालीं लिहिलेलीं वाक्यें व खोटे आणि अपकीर्ति करणार आरोप आहेत तेः—

"The first named petition—writer Shriram Motiram sometime ago wrote several anonymous and false petitions against the Sub Registrar of this place. He also sent petitions to Deputy Commissioner against the sub Registrar by names of the persons who knew nothing of them. And the Deputy Commissioner of Akola in his Marathi Miscellaneous class No. 363 dated 31-12—89 informed Shriram Motiram through the Patel of this place that his license would be concelled if he further did any act of such kiud. But this did not improve him.

Since the passing of the above order Shriram made two other false applications, one on the 1st June 1890 and the other on 28—7—90 regarding petition writers. The contents of which on enquiry found to be utterly false.

I am told he has some friends among clerks in the Civil Court, and thereby without fear of detection, he gets information from office and reveals to persons interested therein. I have great suspicion about him and his companion Yadav Vishnu.

Once a file of Marathi orders was missing. It was kept in the record room and on enquiry I learnt that these fellows haunted record room to get information. But these men being outsiders, the charge could not be brought home to these men.

Not only this I found Shriram growing day by day more impudent even against *myself*, and he openly insulted me in the open court more than once.

In the civil suit no. 476 of 1891 he appeared before me as an agent for the Pltf his uncle, and in a written statement deliberately charged me for writing false statements.

पुराणांत अनेकप्रकारचे इतिहास, मनोरंजक व उपयुक्त आख्यानें, बोधपर व नीतिपर मनोहर, कथा ईश्वराच्या अनेक अवतारकथा, सूर्यवंशी व सोमवंशी राजे कोणकोण झाले, सृष्टि कशी उत्पन्न झाली, तीर्थें कोणतीं आहेत, त्यांचीं महात्म्यें कशीं आहेत, यांची क्षेत्रें कोठें आहेत, मन्वंतराच्या कथा, कांहीं अद्भुत चमत्काराच्या गोष्टी पुढील भविष्यें, कोणते दिवस पवित्र व त्या दिवशीं कोणतीं व्रतें व दानें करावीं, वर्णाश्रमधर्म, श्राद्ध, मोठमोठ्या यज्ञांचे इतिहास, ग्रहण, नक्षत्र, भुगोल, खगोल, स्वर्ग, मृत्यु, पाताळ, सप्तद्वीपें, व नवखंडादिकांचीं वर्णनें, देव, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस, नागांची उत्पत्ति असून सर्व उपयुक्त गोष्टींचा समावेश केला आहे.

तूर्त भारताची पृष्ठें ४०, गणेशपुराणाचीं २४, वाराहपुराणाचीं १६ आणि नृसिंहपुराणाचीं १६ याप्रमाणें दरमहा रॉयल अष्टपत्री पृष्ठें प्रसिद्ध होत असतात.

याच्या प्रत्येक अंकाची किंमत ८ आणेप्रमाणें वर्षाच्या १२, अंकाची किंमत आगाऊ देणारास ६ रुपये व ट. ख. १२ आणे पडेल.

ता० क०—जर कोणास वर्षाच्या १२ ही अंकाची किंमत एकदम देणाराची सवड नसेल तर प्रत्येक तिमाहीचे ट. ख. सह १॥≡ आगाऊ पाठवावी. अधिक माहिती करितां अर्धा आण्याचें तिकीट पाठवा. म्हणजे नमुन्याचा फार्म पाठवून देऊं.

पुराणप्रकाश छापखान्याचे मालक,

पत्ता:—नळबजार तीनबत्ती, शेट छबीलदास लल्लूभाईचे घरांत,

**पुराणप्रकाश मंडळी मुंबई.**

हरकाळ अकोला .... .... ....

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX — AKOLA MONDAY 27 MAY 1895 — NO 20

वर्ष २९ — आकोला सोमवार तारीख २७ माहे मे सन १८९५ इ० — अंक २०


SIMULTANEOUS EXAMINATION.

Notice of Motion
The House of Commons
1895

Mr. Naoroji—Civil Service (India) (Simultaneous open Competitive Examinations in England and India),—That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of British Power, the loyalty, confidence, contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to increase largely commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these Proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd. June 1893, viz: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations in both Countries being identical in their nature, and all who compete being finally classified in one list according to merit.

हिंदुस्थानांत ब्रिटिश अम्मल चिरस्थायी करण्यासाठीं, हिंदुस्थानांतील लोकांची राजनिष्ठा विश्वास आणि संतोष कायम ठेवण्यासाठीं त्यांची औद्योगिक आणि नैतिक स्थिति सुधारण्यासाठीं आणि त्याचे योगानें ब्रिटिश संयुक्त राज्याचा फायदा करण्यासाठीं, १८३३ च्या कायद्यांतील, बंडा नंतरच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यांतील, १८७७ च्या दिल्ली-दरबारच्या व. १८८७ सालीं जुबिली दरबारच्या वेळीं दिलेलीं वचनें पाळली पाहिजेत आणि १८९३ च्या जुन्या ३ र्‍या तारखेस सिव्हिलसर्व्हिस परिक्षा इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत एकसारखी घेत जावी असा जो ठराव आपण पास केला तो अमलांत आणिला पाहिजे. "

---

## हिंदुस्थानची राज नीति

[ १९ अं. व. पुढें चालू ]

जानपद्मताविषयीं अशी बेपर्वा असली ह्मणजे मग जरी त्यांनीं सद्हेतुपूर्वक सत्कृत्यें केलीं असतील, त्या मानानें त्याना वाटूं लागतें कीं, जें परिचर्येस [ Service ] हितप्रद तें जानपदासही हितप्रद असलेंच पाहिजे. अशी त्यांची भावना झाल्यानें, स्वसत्तावर्धनेच्छा आणि देशहित ह्यांत विलक्षण घोटाळा पडून जातो. आरगाइलच्या ड्यूक साहेबांनीं ज्यास दोष दिला आहे अशा प्रकारच्या ह्या सिव्हिलियन कामगारांचें मूळ रूप धोरण असें आहे कीं, " आपली उधळी आणि जाचक " राज्यपद्धति, होईल तितकें करून, सर्व हिंदुस्थानभर वृद्धिगत करावी. यांत त्यांचा हेतु " आपल्या कारभाराचा विस्तार व्हावा " इतकाच केवळ नसून. त्यांचें असें ठाम मत झालेलें आहे कीं, " उधळी आणि जाचक राज्यपद्धति ही राजकीय अस्वस्थतेवर रामबाण मात्रा आहे आणि तिच्या योगानें इंग्रजी भांडागार भरपूर भरलें जाऊन त्या देशाची स्थिति समृद्ध होईल! हिंदुस्थानची सार्वभौम सत्ता आपल्या हातीं आल्यापासून नियमप्रवर्तनाधिकारी ( Executive ) आणि राज्य नियम संस्थापक ( Legislative ] मंडळाची पूर्ण देखरेख व दाब असला पाहिजे. त्याच प्रमाणें तेथील राज्यकारभारांत ह्या अधिकारी वर्गाचें साम्राज्य चालूं नये ह्मणून गव्हरनर जनरलाच्या जागीं सूज्ञ मुत्सद्याची नेमणूक होत जाऊन राज्यकारभाररूपी नौकेच्या कर्णधाराच्या जागीं त्यानें मोठ्या दक्षतेनें काम केलें पाहिजे.

९ मोठ मोठ्या अधिकाराच्या जागीं नेटिव्हांची योजना ज्यास्त प्रमाणानें करणें: — मला वाटतें, हिंदुस्थानच्या प्रत्येक नेटिव्हालाही असें वाटत असेल कीं, हल्लीं अमलांत असलेल्या ठरावान्वयें देखील योग्य नेटिव्हांची नेमणूक मोठ मोठ्या अधिकाराच्या जागीं ज्यास्त प्रमाणानें करितां येईल. मात्र अशा जागा भरणें ज्यांच्या स्वाधीन आहे त्यांचा प्रकार ' वचस्येकं मनस्येकं, नसला पाहिजे.

१०. पितृवात्सल्य बाळगणाऱ्या हिंदुस्थान सरकारास तेथील राज्यकारभारांत नेहमी अपयश येणारः— राष्ट्र रूपी देहाचें शिरस्थान स्वीकारून सार्वभौम सत्ता संतुष्ट न होतां, हस्त, पाद, फुप्फुस, आणि पचनक्रियोत्पादक इंद्रियाचें ही काम करूं ह्मणेल तर राष्ट्र रूपी देहास जी पुष्टता आलेली दिसेल ती वरपंगीची समजली पाहिजे ह्या पासून त्या राष्ट्राच्या अंगीं खरी शक्ती कधीं ही यावयाची नाहीं आणि यामुळें जरी त्यास कायमची अंगविकृति जडली नाहीं तरी त्यास वारंवार पेटके येण्याची भिती आहे. प्रत्येक ग्रामसंस्था आणि सामाजिक संस्था उपेक्षित ठेवून, राजधानीचें एक ठिकाण कलकत्ता आणि दुसरें लंडन या दोहोंचीच सर्व भर करूं ह्मटलें तर वर प्रमाणें एकंदर हिंदुस्थानची स्थिति होईल.

११ उदार तत्वांस अनुसरून असणाऱ्या सार्वभौमराज्यपद्धतीचा मूळ पायाः— शासन पद्धतीचा भिन्न भिन्न प्रयोग मग ते हिंदुस्थाना सारख्या मृतवत क्षुद्र देशावर कां होइनात—करून पाहण्याची वेडगळ कल्पना सर्वथैव सोडून दिल्याशिवाय सार्वभौम राज्यपद्धतीच्या समीप आपल्याला पोहचतां यावयाचें नाहीं. पण, हिंदुस्थान देश अगदीं प्रेतवत् क्षुद्र असल्यामुळें त्याजवर राजकीय पद्धतीचे प्रयोग निर्भयपणें करितां येतील हें खरें तरी आहे काय? हिंदुलोकांची जात आपल्यापेक्षा कमी पायरीची असेल, ते सुधारणेंत मागसलेले असतील, भाविकपणामुळें त्यांची स्थिति नीच झाली असेल, आणि युरोपियन राष्ट्रांची सामाजिक पवित्रता व बुद्धिवैभव त्यांच्या अंगीं येणें अशक्य असेल; तरी पण इतर पुष्कळ सद्गुण त्यांच्या ठिकाणीं वास करीत आहेत. मानवी प्राण्याच्या कोटींपैकीं अगदीं क्षुद्रतम कोटींत ह्यांची बिनदिक्कत गणणा करण्यापूर्वी इटली, स्पेन, ग्रीस, रशिया, ह्या देशांत जो धर्मभोळेपणा आणि नीतिभ्रष्टाचार माजला आहे तिकडे आपण किंचित्सें लक्ष द्यावें; नंतर आपण आपल्याच प्रश्न करावा कीं, जर ह्या युरोपियन राष्ट्रांची नैतिक आणि धार्मिक सुधारणा होणें शक्य आहे असें आपण मानतों तर तशी सुधारणा हिंदुलोकांची होणें शक्य आहे असें आपण कां मानूं नये? हिंदुस्थानांतील गुन्ह्याची नोंद आणि सामाजिक अनाचार इंग्लंडांतील नोंदीशीं आणि सामाजिक अनाचाराशीं ताडून पाहतां मला नाहीं वाटत कीं त्याच्यांत आणि आपल्यांत महदंतर आहे असें मला वाटत नाहीं. त्यांच्या नुसत्या संख्येवरूनही आपल्या आदर बुद्धीस ते पात्र आहेत. आशिआ खंडांत ब्रिटिश सार्वभौम सत्तेखालीं नेटिव्ह सुद्धां जी लोकसंख्या आहे ती सर्व रशियन राष्ट्राच्या जवळ जवळ तिप्पट होईल इतकी मोठी आहे ! तुर्क देशाच्या सुलतानाच्या ताब्यांत असलेल्या मुसलमान प्रजेपेक्षां ज्यास्त मुसलमानी प्रजा महाराणी सरकारच्या ताब्यांत आहे ! याकरितां थोडासा विचार केला असतां आपल्याला दिसून येईल कीं, २० कोटी लोकांच्या मतास आणि इच्छेस फार काय पण त्यांच्या वेडगळपणाच्या भाविक समजुती आणि महत्वकांक्षा यांस—मान देऊन त्यांचा सदय अंतःकरणानें थोडासा तरी विचार करणें हें अगदीं योग्य वाजवी आणि शहाणपणाचें आहे. त्यांनीं केलेल्या मागण्या तुच्छ मानण्याचा हल्लीं दिसून येत असलेला प्रकार वाईट असून त्यापासून आपले पदरीं मुर्खत्व मात्र येणार आहे.

नेटिव्ह लोकांची वाजवीहून ज्यास्त काळजी वेण्याची जरूरी नाहीं:—

हिंदुस्थानच्या लोकांच्या कल्याणाविषयीं आपण वाजवीहून ज्यास्त काळजी घेऊं लागलों असतां त्यांच्या अंगीं कर्तृत्व शक्तीचा पूर्ण विकास कधींच होणार नाहीं. हल्लीं आपण आपल्या कृष्णवर्गीस जें शिक्षण देत आहोंत तें बंद न करितां अथवा त्यांस स्वैर वर्तन करून अमर्याद पुंडाई करण्यास अवकाश न देतां स्वतःच्या हातापायांचा आणि बुद्धीचा योग्य उपयोग करूं दिला पाहिजे. जी कला व शिक्षण दिल्या बद्दल आपण समाधान मानावें अशा प्रकारच्या कलांचा आणि शिक्षणाचा उपयोग करितां येण्याकरितां त्यांस अवकाश दिला पाहिजे. हिंदुस्थानांत जीं सत्कृत्यें करण्याचा संकल्प करून आपण आरंभ करून टेविला आहे तीं सत्कृत्यें करण्यास जसजशी तेथील लोकांच्या अंगीं पात्रता येऊन उत्सुकता दिसून येईल तसतशी तीं कृत्यें त्यांजवर सोंपवून देऊन त्यांच्यावर ज्यास्त विश्वास ठेविला पाहिजे. या योगानें राज्यकारकारासंबंधी आपल्यास जे हल्लीं अतोनात श्रम पडत आहेत ते कमी होऊन राज्यकारभारही अधिक सुरळितपणें चालवितां येईल.

हिंदु लोकांची वाजवी शक्ति आणि ती आपल्यास अनुकूल करून घेण्याकरितां दाखवावा लागणारा राजकीय दूरदर्शीपणाः— हिंदुस्थानची दिवसे दिवस वर्णनीय होणारी शक्ति व जागरूकता आणि त्यापासून आपल्यास भविष्यकाळीं प्राप्त होणाऱ्या अडचणी यांविषयीं विचार करतांना राज्यकारभारासंबंधी जे आपल्यास अनुभव आले आहेत आणि राष्ट्रांतील प्रमुख पुरुष जो हितोपदेश करिताहेत त्यांकडे दुर्लक्ष करितां कामा नये. " राज्यकारभार आणि तत्संबंधीं आलेले संकट प्रसंग " हे सरकारचे उत्तम शिक्षक होत असें बिशप् हॉल याचें ह्मणणें आहे. तशींच वेळ येऊन, राष्ट्रांतील एखादा बुद्धिमान पुरुष पुढें सरसावला असतां आणि त्या काळीं जी लोकांत विलक्षण चळवळ उडेल ती उडाली असतां आपल्यास त्यांकडे विचार पूर्वक लक्ष दिलें पाहिजे. लोकांत राजकीय चळवळ न होऊं देण्याकरितां आपण लष्करी अमल गाजविला अथवा मोठमोठ्या अधिकारांच्या जागा नेटिव्हास यापुढें बऱ्याच काळपर्यंत दिल्या नाहींत तर हिंदु लोक हताश होऊन त्यांचें सर्व मानसिक धैर्य व बुद्धिवैभव आपला अत्यंत द्वेष करण्याकडे खर्ची पडेल.

१८५७ सालीं झालेल्या बंडांत मुख्य उणीव ही होती कीं, बंडवाल्या लोकांस कोणी तरी विशिष्ट बुद्धिवान व प्रख्यात असा नायक पाहिजे होता; बंडास लागणारें सर्व साहित्य त्याचें स्वतःचें पाहिजे होतें बंड करण्यास त्याचें स्वतःचें योग्य कारण पाहिजे होतें, त्याला स्वतःच्या इच्छे प्रमाणें वागतां आलें पाहिजे होते, शिपायांचा त्याजवर पूर्ण विश्वास असून त्याचा हुकूम पाहिजे होता आणि सर्व प्रकारची जबाबदारी त्यानें आपल्या माथीं घेतली पाहिजे होती. ह्या बंडांत एका देखील प्रमुख संस्थानिकाचें अंग नव्हतें. या पुढें जर कदाचित् असेंच बंड होईल तर आपण हें पक्कें लक्षांत ठेविलें

पाहिजे कीं मागील बंडाची जशी स्थिति होती तीच स्थिति पुढील बंडाच्या वेळीं कायम राहील असें नाहीं.

( पु० चा० )

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ट शुद्ध ३ शके १८१७

विलायतेंत कूपर्स हिलवर एक इंजिनिअरींग कालेज आहे. याची मूळ पीठिका चमत्कारिक आहे आणि इंग्रजी अजब युक्तीची ही संस्था एक उत्तम साक्ष होय. हें कालेज इंडियासाठीं ह्मणून घातलेलें आहे. या विद्यापिठांतून जे विद्यार्थी बाहेर पडतात ते इंडियांत मोठ मोठ्या हुद्यावर इंजिनिअर्स ह्मणून येतात. हिंदुस्थानांत इंजिनिअर लोक पाहिजेत ह्मणून विलायतेंत टांकसाळ घातली आणि तेथें पाडलेली इंजिनिअर-नाणीं सर्व इंडियाभर चालावी असें ठरविलें. अठवल इंग्रजीस प्रारंभ झाला आणि रेल्वे, इमारती, पूल, कालवे वगैरे सार्वजनिक कामें बांधावयाचीं होतीं तेव्हां या देशांत इंजिनिअरींगची कला पढलेले लोक उपलब्ध नसावेत आणि ह्मणूनच विलायतेंत ही कालेजाच्या रूपानें इंजिनिअरींग खाण शोधून काढण्यात आली कीं काय न कळे. त्यावेळीं इंडियात धाडण्या सारखे विलायतेंत देखील इंजिनिअर मिळत नव्हते ह्मणून या कालेजाची स्थापना झाली किंवा एखाद्या निराळ्या तत्वावर तें उभारण्यांत आलें हें कांहीं बरोबर कळत नाहीं.

कूपर्स हिल कालेज ही संस्था अद्भुत आहे आणि तिच्या उत्पादकत्वाचा अभिमान ड्यूक आफ आरगाईल यास विलक्षण आहे. ही संस्था ह्मणजे इंग्रजी राज्यांतलें मोठें कृत्य समजतात आणि ड्यूक आफ आरगाईल इंडियाचे स्टेट सेक्रेटरी होते तेव्हां त्यांनीं तें महत्कार्य प्रारंभ करून सर्व इंडियाभर इंजिनिअरींगचा विजयध्वज लाविला ह्मणून ते मोठमोठ्या सभांतून स्वमुखें आपला गौरव गात असतात. थोडे दिवसापूर्वीं त्या कालेजाच्या एका सभेच्या वेळीं त्यांनीं या कालेजची महती फार वर्णन केली आणि आपलीच ही सत्कृती आहे तथापि मि. चेस्नी हे मुत्सद्दी त्या वेळचे सल्लागार होते ह्मणून त्या मृत गृहस्थालाही जयाचा हिस्सा दिला पाहिजे इत्यादि धोरणावर पुष्कळ गर्वोक्ती ड्यूक साहेबांच्या मुखांतून बाहेर पडल्या.

हें विलायतेचे इंजिनिअरींग कालेज इंग्लिश राजनीतीला वैभवसूचक नसून कालिमा आणणारें आहे. हिंदुस्थानांत विलायतेच्या तोडीचे किंबहुना अधिक पढलेले लोक इंडियांत पुष्कळ मिळतात आणि विलायतेंतही या कालेजा बाहेरचे पुष्कळ मिळत असतील. कूपर्स हिल कालेज वास्तविक नको आहे आणि त्याच्या खर्चाचा बोजा विनाकारण या देशाच्या खजिन्यावर लादला जात आहे. हिंदुस्थानच्या खजिन्यांत मोठी तूट पडली आहे. आणि गरज नसलेलें हें कालेज चालूं ठेविल्यानें ती तूट दुणावत आहे. इंडिया साठीं विलायतेंत इंजिनिअरिंग कालेज याचा खरा अर्थच आह्मास कळत नाहीं. हें कालेज ज्या तत्वावर चालविलें आहे त्या तत्वावर इंडियाचा राज्यकारभार चालविण्या साठीं जितके युरोपियन लोक लागतात त्यांच्या उत्पत्ती साठीं व विद्याभ्यासा साठीं विलायतेंत लग्नगृहें, बाळंतपणा साठीं जननगृहें, शाळागृहें इत्यादि संस्था हिंदुस्थानच्या पैशानें चालविल्यास कांहीं गैर गोष्ट होईल असें आह्मास वाटत नाहीं. कांहीं तरी प्रकारानें कूपर्स हिल्ल कालेजच्या खर्चाची संक्रात कुलपी युक्तीनें इंडियाच्या खजिन्यावर आणिली आहे. त्या कालेजा शिवाय इतर विद्यालयांतील इंजिनिअर लोकांस वगळण्या साठीं विलायतच्या त्या कालेजच्या विद्यार्थ्यांस हा मक्ता किंवा अनन्यगतिक परवाना दिला आहे अशी आमची पक्की समजूत आहे. आमच्या मतें हें कालेज जितकें लवकर बंद करण्यांत येईल तितकें इंग्रजी राज्याला भूषणास्पद होईल.

---

ह्या प्रांतांत मुख्य धंदा शेतकीचा खरा पण निव्वळ शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांची दैना अगदीं अठरा विस्वे आहे. शेती चांगली पिकते आणि दुष्काळांचीं वर्षें इतर प्रांतांच्या मानानें वऱ्हाडाला कमी येतात असें असूनही शेतकरी कर्जबाजारी, सरकारचे बंदे गुलाम, घरची शेती सावकाराचे घरीं घालविणारे, शेतांत काबाडकष्ट करून पोट भरणारे आणि शेती नीट पिकली नाहीं तर उपासमारीनें मरणोन्मुख होणारे असे बनले आहेत. अशी स्थिती वाईट होण्यास शेतकरीच मूळ कारणभूत आहे.

शेतकऱ्याचा उधळपट्टीचा खर्चवेंच उत्पन्ना बाहेर रहाटी इत्यादि गोष्टी. त्याच्या आपत्तीला कारणें आहेत. परंतु आतां गत गोष्टींचा पश्चात्ताप करण्यांत फायदा नाहीं. हल्लीं जी नादारीची स्थिति ओढवली आहे तिचा प्रतिकार करण्यास साधनें कोणती या प्रश्नाचा विचार सध्या लोकांच्या डोळ्या समोर आहे. सरकारी सारा वाढल्यामुळें वरील कष्टमय दशा द्विगुणित झाली. लोकांच्या जवळ कांहीं त्राण उरलें नाहीं आणि त्याचा त्राता स्वतःची सावकार बनत चालला. सावकारच खरे शेतीचे धनी आहेत व शेतकरी निव्वळ मजुरदार आहेत. ज्यांच्या जवळ मालकीची शेती नाहीं त्यांच्या संबंधानें आह्मी आज कांहीं लिहूं इच्छित नाहीं. पण ज्यांच्यापाशीं अद्याप शेती घरची आहे आणि जे सावकारी व्याजाच्या चक्राखालीं चिरडून जात आहेत अशा शेतकऱ्यांचा तरणोपाय सांप्रत कष्टसाध्य आहे आणि त्यासाठींच आह्मी कांहीं उपाय सूचवीत आहों.

बुडत्यास हात द्यावा या न्यायानें जे खरे जमिनीचे धनी सावकारी कर्जामुळें बुडत आहेत त्यांस कमी व्याजानें कर्ज देणारी एक शेतकऱ्यांची पेढी पाहिजे. तगाईचा पैसा देण्याची सरकारानें सोय केली आहे ती या पेढीच्या स्वरूपाची आहे पण तिची कार्यसीमा अति लघु व संकोचित आहे जुनें कर्ज फेडण्यास सरकार तगाई देत नाहीं आणि सरकारची तगाई फक्त शेतीकडेच खर्चावी लागते. या दोन मोठ्या अडचणाच्या अटी आहेत आणि सरकारांतून कर्ज मिळण्यास ही बहुत प्रयास पडतात. ह्मणून आह्मी असें ह्मणतो कीं एक शेतकऱ्यांची भांडवल-कंपनी काढावी. या कंपनीचे सर्व भागिदार धनिक शेतकरीच असावेत. भागिदारा शिवाय इतर गरीब शेतकरी देखील या कंपनीचे सभासद होऊं शकतील. सभासद होण्यासाठीं कांहीं प्रवेश वर्गणी ठेवावी आणि सभासदांपैकीं जे श्रीमान पैसेकरी असतील त्यांनीं कंपनीचे शेअर्स विकत घ्यावेत. कोणत्याही सभासदास जेव्हां कर्ज पाहिजे असेल तेव्हां त्याला जवळील जमिनीच्या किंमतीच्या मानानें कर्जाऊ पैसा देण्यांत यावा. व्याजाचा दर माफक ठेवावयाचा पण पैसे वसूल करण्याची रीत मात्र कडकपणाची व सक्तीची ठेवावयाची. प्रत्येक सभासदाच्या जमिनीचें रजिस्टर-पत्रक ठेवून त्यावरील कर्जाचा बोजा चटकन कळेल अशा प्रकारचे कागदपत्र तयार करावयाचे. कंपनीचें कर्ज घेतल्या नंतर तें फिटेपर्यंत दुसऱ्या कडून कर्ज मिळूं नये आणि जो सभासद कर्ज कंपनी कडून मिळण्या सारखें असूनही बाहेरून कर्ज काढील त्यास सभासदांच्या यादींतुन रद्द केलें जाईल. कंपनी कर्ज फेडून घेण्यास ठीं वाटेल तर सर्व शेती कंपनी मार्फत लागवड कडून टाकील. कंपनी खरोखर निघण्याचा बेत जुळला ह्मणजे कार्यपरत्वें कमी ज्यास्त नियम तयार करण्यांत येतील. सध्यां मोघमांत एका उपयुक्त संस्थेच्या मूळ रचनेची सूचना केली आणि ही सूचना पसंत पडून जमीनदार शेतकरी पुढें सरसावले तर आह्मी या संबंधानें विशेष खुलासेवार लिहूं तूर्त प्रस्तावना केली आहे आणि तिच्या योगानें वर प्रकारची एखादी स्वसंरक्षण करणारी कंपनी निघाली तर सर्वांचें बहुत कल्याण होईल. कर्जाऊ देण्यास मुबलक इतका पैसा पुष्कळापाशीं आहे आणि सचोटीवर व जमिनीच्या तारणावर कमी व्याजानें पैसा पुष्कळ देता येईल पण अशा पैसेवाल्या शेतकऱ्यांची एक कंपनी स्थापित झाली तर आमच्या मतें पुष्कळ गोष्टी निश्चयात्मकपणें आपल्या फायद्याच्या होतील.

---

मुंबईच्या कायदे कौन्सिलांत सभासद नेमून धाडण्या साठीं तिकडील मध्यभागांत निवडानिवडीची मोठी धांदल उडाली. निवडणूकी साठीं चार उमेदवार होते. त्या पैकीं रा. रा. यशवंतराव रानडे यांच्या संबंधानें कोणीच गडबड केली नाहीं. आणि त्यांनीं देखील उमेदवारांत नांव सामील करण्या पलिकडे खटपट केली नाहीं असें दिसतें. आमचे सन्मान्य माजी डायरेक्टर राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार हे मोठ्या ईर्षेनें उमेदवार ह्मणून उभे राहिले तेव्हां आह्मास कौतुकपूर्वक आनंद वाटला. राव बहादूर सार्वजनिक कार्यांत इतके कळकळीनें तत्पर असल्या विषयीं कळतें तेव्हां आमची बहुत काळची भ्रांति निमाली. कांहीं पीकाला विशिष्ट तऱ्हेचें क्षेत्र व हवापाणी लागतें तसें सार्वजनिक कार्यास देखील जरूरीचें आहे असें आह्मास राव बहादुरांच्या उदाहरणा वरून वाटतें. जन्माभ्यास काम करण्याचा असल्यामुळें पेनशनच्या रिकामपणांत राव बहादुरांनीं कायदे कौन्सिलदारी पतकरण्याचें योजिलें हा एक अनुकरणीय गोष्ट होय. नवल्या मुलखांत लोकाराधन व तदनुगामी मतसंप्राप्ति हीं राव बहादुरास थोड्या अवकाशांत साध्य नव्हती ह्मणून आह्मी त्यांच्या निवडणुकी विषयीं आशा धरून नव्हतो. फक्त या निवडानिवडीच्या वेळीं जें गुणदोषविवेचन प्रत्येक उमेदवारा संबंधानें झालें तें अगदीं, एकपक्षीय, मत्सरबुद्धीचें व अश्लाघ्यपणाचें होतें ह्मणून आह्मास अत्यंत वाईट वाटलें. राव बहादुरा वर कित्येक कुबुद्धीनीं जे दोषारोप केले होते आणि कित्येक भाटांनीं जे गुणारोप केले होते ते आह्मास कबूल नव्हते. राव बहादूर आज निवडले नाहींत तथापि ते आपल्या गुणसमुच्चयानें प्रकाशांत येतील तेव्हां कौन्सिलदारी गुणलुब्ध लोकांच्या मतत्रयानें आपोआप राव बहादुरांच्या गळ्यांत माळ घालील अशी आह्मास पूर्ण उमेद आहे. शिल्लकींत अवेरोला दोन उमेदवार रा. रा. बाळ गंगाधर टिळक व घेंडो शामराव गरूड हे राहिले आणि या उभयतां पैकीं राजश्री टिळक यांसच बहुमतानें निवडलें हें कळविण्यास परम आल्हाद वाटतो. बांबे ग्याझेट सारख्या आंग्लो इंडियन पत्रांच्या ह्मणण्या वरून गव्हरनर लार्ड सांडहर्स्ट हे महाराष्ट्रांतील प्रमुख लोकांनीं केलेली निवड रद्द करितात कीं काय हा प्रश्न मात्र उरला आहे. राजश्री टिळक यांस कौन्सिलदारी साठीं नाकबूल करणें ह्मणजे सर्व मध्यभागाचा अपमान होईल आणि एक चांगला ह्मणून गाजत चाललेला गव्हरनर अपकीर्तीस पावेल. ईश्वर करो करून असा प्रसंग येणार नाहीं आणि राजश्री टिळक लोकमान्य आहेत तसे ते आपल्या उदात्त विचारानें, कायदेपांडित्यानें, स्पष्टवक्तेपणानें व सत्याभिमानानें राजमान्य होतील असें आह्मी इच्छितों.

---

थोरले सर सालरजंग ह्यात होते तेव्हां वऱ्हाड प्रांत परत निजाम सरकारास देण्यासंबधानें दोन वेळ प्रश्न निघाला होता. पण अलिकडे त्या बिकट व नाजूक गोष्टीचा अगदीं लोप झाला आहे इतकेंच नाहीं तर असें ही ऐकण्यांत येते कीं हा प्रांत मुंबई इलाख्याला किंवा मध्यप्रांताला जोडण्याविषयीं खलबतें चालूं आहेत. हा प्रांत परत करण्याविषयीं जेव्हां प्रथम बाटाघाट झाली तेव्हां पार्लमेंटांत असा जबाब देण्यांत आला कीं हल्लीचे निजाम सरकार वयांत येई पर्यंत या भानगडीचा उलगडा होऊं नये. लार्ड रिपन साहेबांनीं सर्व राज्यसूत्रें तरुण निजाम सरकारच्या स्वाधीन केलीं तेव्हांपासून हैदराबाद दरबारचा नांवलौकिक वाढत आहे आणि राज्यकारभार पूर्वीपेक्षां अधिक सुयंत्र व सुरक्षित चालला आहे. सांप्रतच्या हैदराबाद संस्थानच्या सुस्थितीवरून हा प्रांत परत दिला असता कांहीं धोका उद्भवण्याचा संभव बिलकूल नाहीं. वऱ्हाड प्रांताचें सरकारी नांव अमानी मुलूख असें आहे आणि तें नांव जों पर्यंत कायम आहे तों पर्यंत हा प्रांत परत देण्या विषयीचा प्रश्न मिटणार नाहीं.

हा प्रांत हल्लींच्या राज्यकारभारापासून मुक्त व्हावा अशी आमची फार इच्छा आहे. आमच्या ह्मणण्याला कारणें दोन आहेत. पक्का इंग्रजी अंमल पुरवेल किंवा पक्के हैदराबाद दरबार पुरवेल. संध्यांची त्रिशंकू प्रमाणें स्थिती आह्मास नको. मुंबई इलाख्यास हा

प्रांत जोडल्या तर राज्यकारभाराच्या खर्चाचा बोजा कमी होईल आणि एका सुव्यवस्थित, सुधारलेल्या व नामांकित इलाख्याशीं संबंध जुळल्यानें स्पर्धेनें वऱ्हाड प्रांताची सर्व तऱ्हेनें उत्तम प्रांतांत गणना होईल. जर निजाम सरकारास परत दिला तर तेवढ्यानेंच आज पिढीभर चालत आलेली इंग्रजी राज्यपद्धति कांहीं लयास जात नाहीं. राजकारभाराच्या खर्चाचा बोजा अर्थात कमी होईलच आणि या शिवाय हैदराबाद दरबाराला कित्या प्रमाणें या प्रांताचा कारभार सर्वत्र प्रचलित करण्यास संधि मिळेल. या प्रांताच्या सान्निध्यानें निजामच्या राज्यांत पुष्कळ सुधारणा होतील; आणि वऱ्हाडामुळें निजामसरकारच्या राज्यपद्धतीला देखील वैचित्र्य येईल. हल्लीं राज्यकारभार चालविणारें जें अधिकारी मंडळ वऱ्हाडांत आहे तें मुंबई इलाख्यांतल्या प्रमाणें सुशिक्षित व धुरंधर नाहीं. पगारावरील खर्चाचा बोजा कांहीं कमी पडत नाहीं पण माल मात्र किंमती प्रमाणें मिळत नाहीं असा आमचा पक्का समज आहे. वऱ्हाड प्रांतांत पुष्कळ मुख्य मुख्य नेमणुका बाहेरून होत असतात आणि त्या आपल्या आश्रितावर उपकार करण्याच्या तंत्रानें फार होत असतात. मेहरबानीचे व वशिल्याचे प्रकार दुसरीकडे नाहींत असें नाहीं पण ते या प्रांतीं विशेष आढळतात. अशा दृष्टीनें निजामशाहींतला अमल देखील त्याज्य होईल असें आह्मास वाटत नाहीं.

---

# The Berar Samachar

MONDAY MAY, 27, 1895

---

The British Raj is an institution of which the main pillars are the English bureaucracy and the political party in India. Both worked well in harmony till a certain point where different interests began to conflict. The Anglo-Indian rulers wish to be the sole occupiers of the field and will not admit the children of the country in partnership of the government. The struggle has already been keen and absorbing. After the days of peace and safety which the British rule secured for the people the next thought was to strengthen the bonds of unity between England and India. This idea is the very germ of further political reform in the nation and each success in the path of progress has still more broadened our views and extended the spheres of our activities. This is all glorious and elevating to the proved traditions of the English people and we hope that under the benign rule of Her Majesty we shall in no distant future enjoy all the birth-rights of a British subject.

---

The agricultural distress is indeed extremely disheartening. It will not avail us to minimize its evils. We shal' have to meet face to face stern facts. The population consists mainly of peasants; the class of these men is involved in debts above head and ears. The agriculturists live a life of hard labour and do not even earn meagre maintenance. They are in a state of utter helplessness. They do not generally own the lands they cultivate, and are mere labourers in the field. The agricultural profession does not enable the masses to live beyond wants. There is not that competence of income which will enchain them to the old and honoured work of their forefathers. The present system of land-tenure vastly multiplies the agricultural distresses. The ryot holds land of the Government with certainty for thirty years only. After that period, enhanced assessments are fixed upon and this settlement practically puts an end to the old contract and makes anew a second proposal. In this way the confidence of the people is shaken. They have no more a vested and permanent interest in the land. The administration of the Forest Act has further aggravated the grievances of the peasants. The masses are gradually becoming discontent with their hard lot. Mr. Hume the founder of the Congrss has already sounded the bugle of alarm. He lays stress on the fact that the contentment of the people is the main—stay of the British government; when the feeling of discontent once catches the mind we do not know what strange and unhappy events we shall have to behold.

The State must lend a helping hand to the sinking agriculturists. We have a very able article on the nature of the state—aid in the learned and instructive address of Mr. D. E. Wacha. He suggests that increased land revenue must be based upon improved husbandry. We shall do well in quoting below his eloquent remarks: He said:—

"After all, when you come to first principles in State finance you find that revenue depends on the ability of a people to pay taxes. Where the ability is poor it is difficult to raise a large revenue. If the national annual national income shows fair progress in agriculture, arts, industries, and commerce you may depend on the greater capacity of the people to bear their national burdens, for after all that capacity is limited by the amount of national wealth. But where there is absence of such advance or where the advance is next to the stagnation stage it is not possible to have the elastic sources of revenue. It is superfluous to state that India is a country which falls under the last category. The majority of the population is engaged in agriculture from which they eke out a bare existence. Diversity of occupation is wanting. There are a few engaged in commerce and some industries. There is no doubt hope in the slow but steady development of the latter. But when we consider that the industrial situation is not likely to undergo any revolutionary change during the next twenty five years to come, the idea irresistibly forces on the mind that nothing could tend to further stimulate wealth in the country than agriculture by means of improved husbandry.

"There is not the least doubt that the State has culpably neglected its duty during the past 50 years and upwards as a landlord. It has done nothing to promote the agricultural industry. It has hardly helped the peasantry by capital until within very recent yearsf Look at the systems of agriculture in China and Japan, specially in the latter country. Here in India all those elements which have made those two countries agriculturally prosperous are sadly wanting—abundant supply of water, manure, agricultural cattle, wood, grass and so forth. In all these respects the State seems to have entirely neglected its duty. It left the impecunious husbandman to Providence and we know what has been the result. In its blind zeal to raise revenue from forests it has actually adopted a series of harsh Forest laws all over the country which are simply suicidal. No private landlord with extensive domains would have committed the folly which the State has in reference to Indian forests. It is these laws which have in measure deprived the peasantry of those very means which are so necessary for improved husbandry."

---

## वऱ्हाड

हवामान— गेल्या सप्तकांत थोडा पाऊस पडला. हवेंत किंचित् गारवा आला आहे. वारा सोसाट्याचा वाहतो तेव्हां उन्हाचा ताप बिलकूल होत नाहीं. पण मध्यंतरीं मनस्वी उकडतें हवेचा उपद्रव कित्येक ठिकाणीं चालूं आहे. ऋतुमान पालटल्या मुळें उष्णतेचें मान ८२ पासून १०६ अंशा पावेतों असतें. यंदा पर्जन्यकालास प्रारंभ लवकर होईल असें दिसतें.

अकोट येथील मोफ्युझल कंपनीचा एजंट परेश या नांवाचा होता. त्यानें कंपनीचे दोन हजार रुपये विश्वासघातानें खाल्ले ह्मणून त्याला एक वर्षाची सजा झाली. मनुष्य गुन्ह्याला कबूल असून उतार वयांतला आहे ह्मणून शिक्षा डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटांनीं थोडी दिली.

मुनशी आझिजुद्दीन यांच्या कोर्टास जिल्हा जज्जाचे अधिकार देण्यांत आले.

रा. रा. विनायक आप्पाजी तहशिलदार अकोट, यांस सरकारतर्फें मुनसिपल कमिटीचे सभासद नेमण्यांत आले.

गेल्या ८ व्या तारखे पासून सहा महिन्यांची रजा मि. जे सिवेल आक्टि. पोलीस सुपरिनटेन्डेंट यांस देण्यांत आली.

पब्लिक वर्क्स खात्याकडे सालोमन टोलाझारस नांवाचा एक रोड-इनस्पेक्टर होता त्यास सरकारी नोकरी वरून दूर करण्यांत आलें.

मि. अहमद अली एकस्ट्रा असि. कानसरव्हेटर, आणि तहशिलदार, मेळघाट १८९६ च्या मार्च अखेर पर्यंत फर्लो रजा देण्यांत आली आहे.

येथून चार मैलावर रात्रौ वाशिमचा टप्पा लुटण्याचा कांहीं दरवडेखोरांनीं प्रयत्न केला होता पण तो अखेर गाडी हांकणाऱ्याच्या हुशारीनें फसला!

रा. रा. विठ्ठलो नारायण व लक्ष्मणराव गोखले तहशिलदार या उभयतांच्या बदल्या अनुक्रमें पुसद व केळापूर येथें केल्या आहेत.

---

नोटीस

जानूजी वल्लद गणुजी वगोर शिंपी राहणार जळगांव तालुके जळगांव जिल्हा अकोला यांस

खालीं सही करणार ईज कडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे आहात तुह्मी सुमारें ९ नऊ वर्षांपासून वागवीत नाहीं याचे पूर्वी मी एकदां नांदण्यास आले होतें त्या वेळीं कसें वागविलें त्याज विषयीं व वर दर्शविलें वर्षांत ४३२ चारशें बत्तीस रुपये लोकांचें कर्ज खाल्लें तें द्यावें व मजला घेऊन जावें अशी अमडापूर पोष्टांतुन नोटीस नंबर ५९ तारीख ८ माहे मे सन १८९५ इसवीची दिली. त्याचा जबाब मजला मुदत संपली तरी मिळाला नाहीं. तत्रापि आणखी वर्तमान पत्र द्वारा नोटीशीनें कळविण्यांत येते की वरील नंबरचे नोटीशींत लिहिल्या प्रमाणें नोटीस पावल्या पासुन आठ दिवसाचे आंत निकाल करणार नाहीं तर मी दुसरा घरठाव करीन मग आपला नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. कळावें तारीख २३।५।९५ इसवी. दस्तुर नारायण भगाजी मोरे रहाणार अमडापूर

( सही )

सहीची निशाणी बनी मर्द जानुजी

इचे हातची दस्तुर सदर.

---

नोटीस.

रा. रा. संतु वल्लद लक्ष्मण व रामचंद्र वल्लद संतु माने राहणार स्टेशन फाईल आकोला. यांस

नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, तुमचें घर तुह्मी विकत ता० १३-६-९४ रोजीं रेणु प्रसाद उत्तमचंद यांस दिलें आणि ता० १५-६-९४ इ. रोजीं त्याच घराची भाडेचिठ्ठी लिहून देऊन तें घर पुन्हा तुह्मी राहण्यास घेतलें. या विक्रीखता प्रमाणें ताब्यासह पूर्ण मालकीचे हक्क व भाडेचिठ्ठी प्रमाणे भाड्याच्या रकमेवरील हक्क रेणुप्रसाद कडून ता० १६-५-९५ रोजीं खालीं सही करणार यांजकडे आले आहेत.

आमच्या आलेल्या हक्काअन्वयें कळवितों कीं, तुह्मी नोटीस पोंचल्यापासून तीन दिवसांचे आंत घर खालीं करून द्यावें आणि आजपर्यंत तुंबलेलें भाडें ८ रु० १० आणे आणून पोंहचतें करावें. असें न केल्यास कोर्टमार्फत तुह्मास घरांतून काढून टाकीपर्यंत दरमहा पांच रुपये आगाऊ रीतीनें भाडें पडेल, कोर्टखर्च द्यावा लागेल, आणि इमारतीची किंवा तिच्या चिज वस्तुची गैरवाजवी नासधूस केली तर त्याबद्दल फौजदारीही केली जाईल. कळावें. तारीख २५-५-९५ इ.

( सही )

विष्णु वासुदेव खरे रेल्वे स्टेशन, आकोला.

---

## वर्तमानसार.

रशियाचें ह्मणणें ऐकून तहांत फिरवाफिरवी केल्यामुळें, जपानांतील कांहीं लोक भडकून जाऊन, दंगा करण्यास प्रवृत्त झाले आहेत. त्यामुळें प्रधान व वकील मंडळ यांना संभाळण्यासाठीं लष्करी बंदोबस्त सक्त रीतीनें ठेवला आहे.

मुंबईंत हिंदुमुसलमानांचा दंगा झाल्यानंतर सिद्दी लोकांच्या प्रमुखाला 'राजा' व त्याच्या स्त्रीला 'राणी' हें उपपद दिल्या नंतर मुंबईंतील खुजाई जातीच्या सवीस हजार मुसलमानांतील निवडलेल्या सहा इसमानां सरदार हा किताब देऊन, पिवळ्या शालीचा नजराणा देण्यांत आला.

श्रीस. वि.

वादळानें स्टेशन उडालें—ईस्टर्न बेंगाल स्टेट रेल्वेवरील माविहरीस्टेशन सुमारें १०–१२ दिवसांखालीं वादळानें उडून गेल्याचें समजतें.

इं. प्र.

जामनगरचे श्रीयुत जाम हे मेल्यामुळें त्यांच्या गादीबद्दल तंटा पडला होता. मृत जाम साहेबांस लग्नाच्या १३ बायका असून ५ मुसलमानी जनानखान्यांत राखलेल्या आहेत. जाम साहेब हे रजपूत असून त्यांच्या तेरा रजपूत जातीच्या बायकांचे पोटीं त्यांस पुत्रसंतान मुळींच झालें नाहीं. परंतु त्यांच्या दोन मुसलमान जातीच्या रखेल्या औरताचे पोटीं दोन पुत्र काळुभा व जसवंत सिंगजी ह्या नावांचे— आहेत. ह्या दोघां मुसलमान क्षेत्रांपासून उत्पन्न झालेल्या दोन पुत्रांतील काळुभाला लखुभा या नांवाचा एक पुत्र आहे. कै० जाम साहेबांनीं आपल्या नवळचे संबंधाचा एक नातु, कुमार श्रीरणजित सिंहजी ह्या नांवाचा एक मुलगा, इंग्रज सरकारच्या परवानगीनें फांडाबर घेतला तो मुलगा हल्लीं इंग्लंडांत विद्याभ्यासासाठीं जाऊन राहिला असून तो लवकरच ब्यारिस्टरच्या परीक्षेस बसणार आहे, इंग्लंडांत क्रिकेट खेळण्यांत ज्यानें मोठें नांव मिळविलें व ज्याला केंब्रिज येथील बिवरल क्रिकेट क्लबाचा क्याप्टन व केंब्रिज युनिव्हर्सिटीचा एक मेंबर नेमण्यांत आलें आहे तोच हा कुमार रणजितसिंह होय. या चौघांही वारसदारांच्या हक्कांचें परिक्षण केलें तर त्यांतील शेवटचें तिघे औरस नसुन ते खरे रजपूत नव्हत. आणि ह्यासाठीं हिंदुधर्मशास्त्रप्रमाणें त्यांचा गादीवर वारसा नसून ते फक्त अन्नवस्त्राचे अधिकारी आहेत. राहतांपैकीं कुमार श्रीरणजितसिंगजी हा राहिला. तो जाम साहेबांचे रजपूत कुळांतला व स्वकीय असून जाम साहेबांनीं त्याला सरकारचे परवानगीनें दत्तक घेतला आहे. व तोच खरा हक्कदार व वारस समजला गेला पाहिजे, असें सर्वांचें मत आहे.

क० त०

रायबहादूर ए. अयंगर यांच्या बदलीं राव० अनंद चर्लू हे प्रसिद्ध मद्रासी गृहस्थ गव्हरनरजनरलच्या कायदे कौंसिलचे मेंम्बर नेमले गेले.

शान हे कान या ठिकाणच्या चिनी फौजेनें बंड करून तें शहर लुटलें. तेथील रहिवाशी लोक पळून गेले कारण बाहेर आले नाहीं, पण जपानाशी झालेला तह त्यास आवडला नसल्यामूळें त्याणीं असें केलें असावें असें अनुमान आहे.

कचंग हे ब्रह्मदेशाकडचें ठिकाण लवकरच सायाम सरकारास देण्यांत येणार असें ब्रह्मी सरदाराच्या दरबारांत पर्वा चीफ कमिशनरानें बोलून दाखविलें. त्यास कित्येक इंग्रजांची हरकत असून ते त्याबद्दल चर्चा करीत आहेत.

अरु०

आमचे सरकार कमी खर्च करायाला लागले कीं, प्रथम शिपायावर धाड, मग कारकुनावर धाड किंवा कारकुनांनीं बसायच्या गाद्यांवर धाड, पेन, पेन्सिली, कागद यांवर धाड असला प्रकार व्हायचा. इकडे कांपेनसेशन अलावन्स देण्याला, चित्रालवर डौलदार स्वारी करण्याला, अमिराच्या मुलास बादशाही थाटानें विलायतेस नेण्याला थैली खुली! याच प्रमाणें मोठाल्या पगाराचे युरोपियन किंवा युरेजियनस यांजकडे आमच्या जी. आय. पी. कंपनीनें बिल्कूल ढूंकून न पाहतां पेंटरस, फोरमन, सिग्नलर ह्यावर सर्व धाड आणून पाडली आहे. गुलजार, छत्रकले, व गोऱ्या रंगाचे, नवाबदारीच्या कामापासून मुक्त अशा टिकिट कलेक्टरांच्या केसास देखील धक्का आमच्या कंपनीनें लावला नाहीं. टिपू सुलतानास गोरीं साहेब लोकांचीं मुलें हुजरे करण्याचा फार नाद असे त्याच प्रमाणें आमच्या ह्या काकूबाईस ही पुष्कळ खर्चाचीं गोरीं गोमटीं मुलें हुजरेगिरीवर कशास पाहिजेत समजत नाहीं. दे० से०

रायगडावरील शिवछत्रपतीच्या समाधीचे जीर्णोद्धारास मदत करण्यासाठीं ठिकठिकाणीं वर्गण्या जमविण्याची तजवीज चालू झाली आहे. ह्या जीर्णोद्धाराचे संबंधानें बडोदे येथील एक हितचिंतक गृहस्थ कोल्हापूरचे छत्रपति महाराजांकडे एक अर्ज पाठविणार आहेत. त्या अर्जास अनुकूल अशा सह्याची त्याला फार अपेक्षा आहे; सबब इकडील ज्या गृहस्थांची इच्छा क्षत्रियकुलावतंस शिवछत्रपतींच्या समाधीचा जीर्णोद्धार व्हावा अशी असेल, त्यांणीं आपल्या सह्या बडोदें येथें सदर्हू हितचिंतकांकडे त्वरित पाठवाव्या, ह्मणजे त्यांचे अर्जास महत्व येईल.

धर्मपत्निला अंतर देती, खंत न मानुनि अंत कराया कुलकीर्तीचा, उद्भुत झाले अद्भुत बेटे, पैसे देऊनि खाती खेटे, तसेच सोटे रंडिहातीचे रातनदिवसा, कोण पुसे हरिदिनि अवसा, लाज नाहीं लाज नाहीं ही कां भलाइची रीती, गडे हो कांहीं धरा मनि स्फीती ॥१॥ विचार करितां घरीं तेथी बाहेर असुनि अविचारानें व्यर्थ फसोनि। धनशक्तीची बुद्धिमतेचा नाश करोनि पाश यमाचा बिकटाचे अति निकट करावा। नर्कपुरीचा मार्ग धरावा, तारुण्याची करुनी माती, उपदंशाची उठविति साती। गरमी परमा नावें ओंगळ शरीर भोंगळ। खाती पारा क्लेश सारा अंगीं चढे, गळ्यांत पडे, खाटे खिळुनी पडती रडे। नाहिंउणें मग किमपिही थट्टे, पोरें हांसति, खोखो करिती घोंबें माशा सुरेख खाशा, ही का भलाइची रीती। गडे हो कांहि धरा मनि स्फीति ॥ २ ॥ स० शो०

जिवंत मांजरांस चिनांत फार मान असतो, आणि मेलेल्या मांजराला तर फारच गांजराच्या कातड्याचे कपडे ह्मणजे अत्यंत उंची मानतात. आणि मांजरांचें मांस फार आदरानें खाल्लें जातें. ज्या कोणास छातीचा अगर फुप्फुसाचा रोग असेल त्यास तर मांस फार उत्तम असें मानतात. कोंडलीवर आईलपेक्षां तें मांस फार चांगलें असें लोक समजात. काळ्या मांजराचें मांस अत्यंत उंची समजलें जातें. आणि कित्येक प्रांतांतून मांजराच्या मांसाचें महत्व इतकें वाटतें कीं, मेंढें, शेळ्या, कोंबडी, डुकरें वगैरे प्रमाणें मुद्दाम बाळगून पोसून विकलीं जातात. क०

जामच्या गादीवर चार जणांचा हक्क पोंचतो; असें असतां; ब्रिटीश सरकारतर्फे पोलिटिकल एजंट साहेबांनीं औरस पुत्रास एकीकडे ठेवून क्षेत्रज (राखलेलीच्या पोटीं जन्मलेल्या) पुत्रास गादीवर बसविलें! हिंदुधर्म शास्त्राप्रमाणें ही झालेली व्यवस्था दोषास्पद आहे.

वि० सा०

पोलिसच्या शिपायास फौजदारी समन्स लागू करावयास कांहीं अडचण पडत नाहीं. प्रतिवादीस दाखवावयास तुह्मी चला असें तो वादीस ह्मणत नाहीं आणि समन्साची बजावणी जशी व्हावी तशी होते. पोस्टाच्या शिपायास रजिस्टर केलेली आणि विमा उतरलेलीं पत्रें आणि बंग्या ज्याच्या त्यास पावत्या करावयास कोणी दाखविणारा लागत नाहीं. हीं एवढी जोखिमेचीं कामें पोस्टाच शिपाई मोठ्या इमानानें आणि प्रामाणिकपणानें करितात, आणि दिवाणीच्या बेलिफास प्रतिवादी दाखवावयास वादीची जरूर कां असते?

शु० सु०

## करुण विलास.

( जगन्नाथ पंडिताच्या कवितांचें मराठी भाषांतर )

झालें परा[१]वृत्त प्राक्तन हाय ! हाय ! ॥
कांता त्यजूनि मज मोक्षपदास जाय ॥
दुःखें, मना ! वद कुणास निवेदशील ? ॥
तें कोण शीत वचनें तुज शांतवील? ॥१॥
[२]स्त्रैड येऊन तुवां पहिल्या प्रमाणें ॥
जे मार[३]दूत असल्या मधु वीक्षणानें ॥
संभाषणें हि तसल्या, शतपत्र नेत्रे ! ॥
कां शांत आज करिशी न मदीय गात्रें॥२॥
गेली लयास विषय स्मृति सर्व यैव ॥
विद्या त्यजी मज सखेदपणें सदैव ॥
तूं मात्र एक शशिशावक लोचना ती ॥
आराध्य देविसम राहतसे मदंतीं ॥३॥
निर्वाण मंगल पदीं रिघता त्वरेनें ॥
त्वां टाकिलीस ममता पहिली प्रियेनें ॥
नेला प्रभात्कमल गर्व हरुनिसर्व ॥
गेले कुठें तव कटाक्ष असे अपूर्व ॥४ ॥
* पोटीं पदस्खलन भीति धरून, पाहीं !॥
हातां धरून चढलीस शिला विवाहीं ॥
तूं भीरु तीच मज टाकुनि स्वर्ग मार्गी ॥
गेलीस, हाय! मन हें शतधा विभागी!॥५॥
+ निर्दूषणा गुणवती रस भाव पूर्णा ॥
सालंकृता श्रवण कोमल रम्य वर्णा ॥
जी कां मदीय कवितेसम शोभनीय
ती प्रीय मूर्ति हृदया न त्यजूनि जाय!॥६
त्वां सोडलेंस जग हें सुभगे ह्मणूनि ॥
चिंता समस्त त्यजली सरसीरुहांनीं ॥
झालें प्रसन्न शशिबिंब अपूर्वतेनें ॥
ह्या कोकिला कलरवा करिती मजेनें! ॥७॥
सौदामिनी सम अके महेंद्र भोगें ॥
तर्पूनि नित्य मज आजवरी शुभांगे ॥
लक्ष्मी त्यजी नयविहीन जशी नृपास ॥
गेलीस दैवहत सोडूनि ह्या जनास ! ॥८॥
× केला असेल अपराध चुकूनि कांहीं ॥
झाली असेल कुपिता करभोरु कां ही ?॥
पत्यातुरा असुन ही युवती ह्मणून ॥
गेलीच मुक्तिरमणी सदना निघून ॥९॥
पीयूष[१०]वत् विविध भोग विभोगियेले ॥
ते मी मदीय कवितेंत निवेदियेले ॥
ते भोग आज असतां मज नष्ट झाले ॥
व्हावें कसें कवन सुंदर? चारुशीले! ॥१०॥
हास्यप्रभा अभिनवोज्वलता जगाला ॥
दे, वाटली ह्मणुनि जी विफला कवीला ॥
ती पौर्णिमा सकल वैभव पूर्ण झाली ॥
प्राणेश्वरी मम जशी जगतीं निमाली!
॥ ११ ॥
※ मंदस्मितामृत रसें अभिषक्त केलें ॥
नेत्रोत्पलें प्रतिदिनीं मज पूजियेलें ॥
ती नित्य मंगलमयी, हृदयेंगृता ती॥
कामेश्वरी सतत ती वसते मदंतीं ॥१२॥
"नाथा! अहो रमण! "बोलुनि ह्या वचांला
स्वर्गीं तुवां चढविलेस तुझ्या सख्याला॥
जाऊनि सांप्रतवरी, धरणी धुळींत ॥
त्वां लोटलेस मज हाय! सखे! क्षणांत
॥१३॥
लावण्य उज्वल तसें रमणीय शील ॥
संमोहनीय विनय, व्रत पुण्यशील ॥
टाकूनि सद्गुण असे मजही त्यजून ॥
गेलीस हाय सखय त्रिदिवीं निघून ॥ १४
सोन्या परीस रमणीय तनु प्रभेनें ॥
त्वां जिंकिलीस दहनोज्वलता प्रियेनें ॥
चतोहरा असुनिही दहनें ह्मणून ॥
केलें तुझें दहन कोपवशें करून! ॥ १५ ॥
कर्पूरवर्तिसम लोचन ताप हंत्री, ॥
कंठास पंकजसरासम सौख्य दात्री ॥
आल्हाद रम्य कवितेसम होय देती, ॥
दिव्या[१३]प्सराचित अशी सखि शोभली ती॥१६
= स्वप्नांतही परजनाप्रत साभिलाष ॥
त्वां प्रेरिलेस अपुले न कधीं कटाक्ष. ॥
ती संप्रति त्यजुनि तूं मज, भोगण्यास ॥
गेलीस निर्गुण अशा पुरुषाकडेस.॥ १७॥
शोजेवरी पतिगुणाप्रत आठवून ॥
नेत्रास काळ आपुला मधला क्रमून ॥
मी नाथ तो विनवितो पण हाय हाय!॥१८॥
वर्षे जणों अमृत, शब्द तसे रसाळ. ॥
लावण्य सत्कवि[१४]नुतें दिसे विशाळ, ॥
सारी असे कृति सदैव सुखे समान ॥
गाया कसें न मन होय तुला प्रसन्न? ॥१९

BEE.

१ पाठमोरें. २ सलज्ज. ३ मदनाचे दूत. ४ हे कमल नेत्रे. ५ हरीण बाळासम नेत्रजीचे ६ शोभतसे

* विवाह समयीं शिळेवर आरोहण करण्याचा एक विधि आहे; त्यास अनुलक्षून कवि ह्मणतो कीं, लहानशी शिळा असूनही तिच्यावर चढते वेळीं तुला माझ्या हाताचा आधार द्यावा लागत्या आणि आतां अत्यंत उंच अशा स्वर्गावर चढून जातांना माझी जरूर न ठेवतां तूं एकटीच निघून गेलीस ! ७ पाय सरेल ही भीति * * ह्या कवितेंतील विषेश कवितेस व स्त्रीस सारखीच लागू पडतात. ८ कमलांनीं. ९ अन्यायी.

× पतीवर स्त्री रागवली असतां आपल्या मैत्रिणीच्या घरीं निघून जते ह्या चालीस लक्षून कवि ह्मणतो कीं, हे प्रिये. मजकडून अपराध झाल्या कारणानें तूं आपली सखी जी मुक्ति तिच्याकडे ( तूं पतिव्रता असून ही ) रुसून गेलीस काय? १० हत्तीच्या सोंडे प्रमाणें मांड्या जिच्या. ११ अमृता प्रमाणें

※ ह्या कवितेंत विशेषणांच्या योजनेंत कवीनें विषेश काळजी घेतली नाहींसे दिसते. १२ स्वर्गास. १३ सुंदर अशा अप्सरांनीं पूजा करावी अशी.

= ह्या कवितेंत "अनौचित्य" हा दोष आहे असें वाटतें. निर्गुण पुरुष ( परब्रह्म ) ह्या शद्बांत जरी श्लेष आहे तरी ती कल्पना कांहीं शुद्ध नाहीं.

१४ उत्तम कवींनीं स्तुति करण्यास योग्य असे.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.